## प्रकरण ७

# गणेश चौधरी यांचे 'काचेचं मन'

## प्रस्तावना :-

साहित्याच्या क्षेत्रात आपल्या लेखनाने स्थान मिळवलेले गणेश चौधरी यांचा जन्म जळगांव जिल्ह्याच्या डांभूर्णी या एका छोट्याशा ग्रामीण भागात झाला. 'काचेचं मन' व 'नागवा' या दोन पुस्तकांमुळे गणेश चौधरींचे मानस विश्व चिरंतन सत्याचा शोध समजून घेता येतो. हे साहित्याचे अंतिम कार्य मानले जाते. स्वत:च्या वेडाची चिरफाड, शस्त्रक्रिया यांचा एक 'केस पेपरच' ही पत्रे मांडतात. म्हणूनच मराठी साहित्यातून त्यांचे मोल अमोल आहे. व्यक्त होणारं दु:ख साहित्यातून असो की, आणखी कुठल्या माध्यमातून असो, हे साहित्य शहाण्यांचं असो, वा वेड्याचं, दु:खाची स्थाने भिन्न असली तरी ही ते इतकं सनातन असतं की, प्रत्यके काळात मानवी मनाला सारखंच भिडत असतं. कवी गणेश चौधरींच्या साहित्यातूनही ते असेच व्यक्त होत रहातं, अन् त्यांच्याशी आपली नाळ जोडली जाते. म्हणजेच येथे सर्वस्व पणाला लावून 'काचेचं मन' पुन्हा पुन्हा तपासून पहाणं, बेभान होणं, हेच दु:ख त्यांना आपल्या 'काचेचं मन' या पत्रात्मक आत्मकथनातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि ही पत्रे म्हणजेच नैसर्गिकपणे स्वत:च्या मनाला पाडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न येथे गणेश चौधरी यांनी केला आहे.

## गणेश चौधरी यांचे 'काचेचं मन' :-

चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन या साहित्याच्या अभ्यासाठी 'चरित्रात्मक समिक्षा' पद्धतीचा उपयोग केला जातो. मराठीत 'पत्रात्मक आत्मकथन' ह्या एका वाङ्मय प्रकाराने साहित्यात आपले एक वेगळेपण सिद्ध केले आहे. यांच प्रकाराचे गणेश चौधरी यांचे 'काचेचं मन' हे पत्रात्मक आत्मकथन साहित्यात आले.

१.१ **'काचेचं मन' मधील पहिले पत्र दिवाकर चौधरी यांना गणेश चौधरींनी लिहिले आहे. तसेच हे पत्र दिनांक ११/४/१९६९ रोजी लिहिले आहे.**

१.२ चौधरींनी या पत्रातून चि. बाळास आशीर्वाद देण्यासाठी पत्रलेखन करतात. यामधून त्यांनी त्यांचे निरपेक्ष प्रेम सांगतात. तसेच पत्नीबद्दलचे प्रेम आणि तिला दिलेल्या दु:खाचा पश्चाताप व्यक्त करतात. आज जाग आली आहे. त्या अज्ञात वेड्यामनाची जाणीव त्यांना झाली आहे. त्याच्या वेडाकडे सर्वांनी दूर्लक्ष केल्यामुळे त्यांचे वाढलेले वेड ते सांगतात.

त्यांना गरज होती मानसिक आधाराची त्यांना समजून घेण्याची, पण त्यांना समजून न घेतल्यामुळे झालेल्या वेदनेचे चित्रण ते करतात. तसेच आपल्यामुळे बाबांना दु:ख, मानहानी सोसावी लागली होती. हे अनर्थ सर्व त्यांच्या वाढलेल्या क्रोधामुळे झाले. त्यासाठी दिवाकरला क्रोधावर नियंत्रण ठेवण्यास सांगतात आणि कल्पनाला कधीही दु:ख देऊ नको तिची काळजी घेण्यास सांगतात. आणि शेवटी त्यांना खर्चासाठी लागणारे पैसे मागत असताना त्यांच्या मनाची होणारी अवस्था लिहितात.

१.३ दिवाकरला पाठवलेल्या या पत्रातून गणेश चौधरींच्या भावनिक स्वभावाचे दर्शन होते. येथे त्यांचे निरपेक्ष प्रेम आपल्या पत्नी व मुलांच्यावर आहे पत्नीला सासावे लागणारे दु:ख, यामुळे त्यांच्या डोळ्यात पाणी येते. ते देवा जवळ प्रार्थना ही करतात की मला हीच पत्नी आणि मुले दे पण हे वेड देऊ नकोस. येथे त्यांना पश्चाताप झालेला आहे. याचे चित्रण करताना त्याचबरोबर आपल्यामुळे वडिलांना झालेल्या वेदनांचे दु:खही त्यांना होते. आपण मुलगा म्हणून कोणतेच कर्तव्य पार पाडले नाही. याची खंत वाटते तर आपल्या माणसाच्या काळजी पोटी दिवाकरला क्रोधावर नियंत्रण ठेवण्यास सांगतात आणि कल्पनाला दु:ख देऊ नकोस असा प्रेमळ सल्लाही देतात. त्याचप्रमाणे स्वत:च्या खर्चासाठी लागणारे पैसे मागत असताना त्याच्या मनाची होणारी अवस्था ही ते लिहितात. येथे गणेश चौधरी प्रेमळ आहेत. त्याचबरोबर आपल्या माणसांनी आपल्यासाठी घेतलेल्या कष्टामुळे त्यांच्या मनाची होणारी कुचंबना जाणवते.

१.४ गणेश चौधरींची मानसिक कुचंबना या पत्रातून डोकावताना दिसते. येथे ते सांगतात आपल्या आजारपणात आपल्याकडे कोणीच लक्ष दिले नाही. डॉक्टरांनी हे वेड लपवले होते. त्यांना होणारे भास, भ्रम त्यांनी जाणवणारी शारीरिक कमतरता त्यांचे होणारे हाल, याकडे कोणीच लक्ष दिले नाही. या संदर्भात लिहितात, ''माझा मी उरलो नव्हतो. साऱ्या भावना चंचल, क्षणिक, काहितरी विचित्र सलत असल्याची वेडी जाणीव सतत भ्रम, भास, आभास, विचित्र वैचारिक दृश्ये, संभ्रम अस हे प्रचंड वेड! असत्या भासाचे विचित्र वेड! त्या दोन तीन महिन्यात मी ठार वेडा नव्हतो काय? अक्षरश: कुणीही शहाणा बोलणार नाही ते खोटं बोलूनच मी यांच्या-त्याच्या जवळ सांगत होतो, हे कसलं लक्षण? तथापि, उभ्या आयुष्यात तर राहूच दे, पण त्या दिवसातही मला मानसोपचाराची निदान

दवाखाण्याची नितांत गरज आहे. हे बाबांना कुणी सांगायची गरज होती काय? मनाचा तोल मला साधताच येत नव्हता."[१] म्हणजेच गणेश चौधरी यांची मनस्थिती दोलायमान अवस्थेत आहे. एकीकडे त्यांना घराची काळजी वाटते तर दुसरीकडे आपल्या ते आपल्या वेडाचे कारण म्हणून सांगतात.

१.५ अनेक तज्ज्ञांनी या पत्रांच्यावर आपली मते मांडलेली आहेत. यामध्ये आर. डी. लेंग यांचा उल्लेख करून घारे म्हणतात, "संत आणि वेडी माणसं यांच्या अनुभवामध्ये बऱ्याचवेळा फरक करणे कठीण असते. येथे लेंग हे कोणी मानसविद् आहेत की समीक्षक हे स्पष्ट होत नाही. बरे कोणीही असले तरी संतांचे ध्येय ठरलेले असते. सात्विक प्रवृत्तीचे सत्याप्रत ते जाणण्याकरिता अखंड प्रयत्नशिल असतात. वेड्या व्यक्तीच्या संदर्भात ठामपणे कोणतेच विधान करता येत नाही."[२]

**२.१ हे पत्र चि. पेमास गणेश चौधरी यांनी दिनांक ७ जुलै १९६९ रोजी लिहिले आहे.**

२) गणेश चौधरी पेमाला आशीर्वाद देण्यासाठी पत्रलेखन करताना त्यांचे लग्न झाल्याचे समजल्यावर त्यांना तुषारची आठवण होते. पेमाकाकाच्या लग्नात आपण काय गम्मत करायच्या हे त्यांने ठरवले होते. या आठवणी त्यांचे लग्न झाले समजतातच ताज्या होतात. तसेच ते सांगतात आपल्या वाणी, लेखणीशी मी प्रमाणिक आहे. सत्याचा पुरस्कार मी आता करणार असल्याचे लिहितात. त्याचबरोबर त्यांच्या मनात येणारे अनेक विचार ते लिहितात. डॉक्टरांनी आणि पत्नीने दिलेला दिलासा मला काही झाले नाही हे भ्रम आहेत. हे सांगण्याचा ते प्रयत्न करतात आणि आता पूर्ण जाणीवेत आल्यावर पून्हा केस सुरु करण्याची इच्छा व्यक्त करतात. त्यांना कोर्टाने दिलेला न्याय मंजून नाही. यासाठी पुढच्या न्यायालयात केस पुन्हा सुरु करण्यासाठी कागद पत्रांची जमवाजमव करावी आणि वडिलांची पहिल्यांदा भेटीची अपेक्षा करतात. पत्नीने सोसलेल्या वेदनांची जाणीवेत त्यांना होणाऱ्या वेदनांचे ते चित्रण करतात.

२.३ या पत्राच्या माध्यमातून पेमाला आशीर्वाद देण्याच्या त्यांचा मानस आहे. आपल्याजवळ काही नसले तरी आशीर्वादाच्या रुपाने असलेले प्रार्थना ते करतात. या पत्रातून ते आपल्या जवळ असणारी दोन घरे त्यांचे आज मिळत असलेले स्नेह ते सांगतात. वेडामध्ये सर्व गेलेले होते. त्यामध्ये सर्वांच्या क्रोध नजरा, बोलणे ऐकून आता या सर्वांचे

त्यांना काही वाटत नाही याही पलिकडे ते गेले होते. त्यांनी केलेल्या मानसशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग करुन ते स्वतःचे मनोविश्लेषण करत आहेत. त्यांना डॉक्टरांचे व पत्नीचे म्हणणे आज पटत आहे. वेड्या अवस्थेत त्यांनी अनेक व्यक्तिंचा पाठलाग केला आहे. तसे पाहिले तर त्यांच्या जीवनात हे वेड आटळ होते. हे वेड कोर्टाने लक्षात न घेता त्यांना शिक्षा दिली होती. त्यांना आपले वेड सिद्ध करायचे होते. पण ते जगण्याची इच्छा होती म्हणून नव्हे तर अन्याय झाला होता. त्यांचा न्याय त्यांना न्यायालयसमोर मागायचा होता. त्यासाठी वडिलांच्या भेटीची प्रथम अपेक्षा ते करतात. आणि केस पुन्हा चालू करण्याची (Reopen) करण्याची अपेक्षा ते या पत्रातून करतात.

२.४ पेमाला पत्र लिहित असताना ते वाहवत गेले आहेत. त्याच्या लग्नासाठी वऱ्हाडी दोघेच येतात. सर्व पंगतीला बॅडवाले दोघेच. त्यांना तुषारची झालेली आठवण त्याला आमंत्रण द्यायचे होते. पण आमंत्रणापलिकडे गेला होता. या नंतर राजा दशरथाबद्दल सांगतात. येथे महर्षी वाल्मीकी सांगतात, 'राम', 'राम' असा आर्त पुकार करत दशरथ टाचा घाशीत मेला याचे वर्णन केले नाही तर येथे राजा दशरथाशी गणेश चौधरी हे आपल्या दु:खाची तुलना करीत आहेत. येथे दोघांचे दु:ख सारखेच आहे असे सांगतात. त्यांच्याबरोबर पत्ते खेळत असताना आपल्यावर 'खून' केल्याचा आरोप करीत असत. हे सर्व त्यांच्या मनाचे खेळ होते, भ्रम होता. सर्व सांगत 'तू तिकडे लक्ष देऊ नकोस' पण त्यांचे वेड अटळ होते. बाथरुममधून अंडरपँटनिशी ओट्यावर धावत, येऊन सर्वांशी भांडतात. येथे ही त्यांची मनोविकृती स्पष्ट होते. येथे त्यांचे वस्त्रहरण होत होते. वस्त्रांचा रंग धवल होत होता. 'ऐकलेल्या', 'भासमान' या शब्दांचे धागे गुंतलेले होते. या गुंत्यामुळे त्यांच्या मनाचा होणारा गुंता वाढत गेला. आणि हेच त्यांच्या मनाविकृतीला कारण ठरले होते.

२.५ श्री. दीपक घारे सांगतात की, ''गणेश चौधरी यांच्या चांगुलपणातील वैचारिक जडणघडणीचा पाठपुरावा करुन गणेश चौधरी यांच्या स्वतःच स्वतःच्या वेडाची मानसशास्त्रीय संगती लावता लावता तर गणेश चौधरी यांचे वेड वाढले नाही ना? अशी शंकाही घारे उपस्थित करतात. फ्राईड आणि युंगच्या मानसशास्त्रीय संकल्पनानुसार गणेश चौधरी यांच्या वेडाची संगती त्यांनी लावलेली आहे.''[३] येथे घारे यांनी व्यक्त केलेली

शंका रास्त आहे. स्वत:चे असे कठोर आत्मनिरिक्षण करुन स्वत:च्या वेडाच्या पाठीमागची कारणे ते शोधत असल्याचे दिसतात.

**३.१ गणेश 'दा'ने हे पत्र सौ. कल्पनास दि. १४ जुलै १९६९ रोजी लिहिले आहे.**

३.२ या पत्रातून कल्पनाने घराची जबाबदारीचा भार उचल्यामुळे त्यांना आनंद झाला आहे. तसेच दिवाकर व विवेकची काळजी घेण्यास सांगतात. आपल्यामुळे त्यांना झालेल्या दु:खाबद्दल त्यांना जाणीव आहे. त्याबद्दल ते मनात पश्चाताप व्यक्त करत आहेत. संपूर्ण पत्रात गणेश चौधरींनी आपल्या पत्नीने त्यांच्यासाठी सोसलेले दु:ख, त्यांच्यासाठी घेतलेल्या कस्ता आणि त्यांनी बरे व्हावे यासाठी केलेले प्रयत्न दिसून येतात. या पत्रात ते 'काचेचं मन', 'नग्न मनाची' शोकांतिका सांगतात. त्यांना होणाऱ्या भास, भ्रम व कोणीही काहीही बोलतात यांचा त्रास त्यांना होत. त्यांना सर्व समजून सांगायचे, पण त्यांना ते समजले नाही येथे त्यांनी अव्यक्त मनाची व्यथा ते सांगतात.

३.३ गणेश चौधरी हे भावकवी होते. पण त्याबरोबर त्यांच्या पत्नीवर असलेल्या अत्यंत प्रेमाचे दर्शन येथे घडते ते पत्नी विषयी लिहितात की, ".... पत्नी ही पतीची काय नसते? सर्व काही असते. सखी असते, प्रेयसी असते, सुख-दु:ख यातील साथी असते. प्रसंगी धीरोदात्त मार्गदर्शिका असते, झिजणारी असते, जळणारी प्रकाश दायिनी ज्योत असते, वादळात झंझावातात पथदर्शिका असते, अन् भ्रांत पतीची ममत्वाने हळूवारपणाने काळजी वाहणारी पत्नी प्रसंगी मातेचीही भूमिका पार पाडते. घराला घरपण येतं ते पत्नीमुळे ती काय नसते? ती सर्वच असते.... सुख-दु:खात विरघळणारी सुखात हसणारी, सुखावणारी अन् दु:खात हळवेपणानं अश्रूंना वाट मोकळी करुन देणारी अन् त्याच वेळी त्याला अमाप सुख देणारी दु:खशोषिका असते."[४] या विवेचनावरुन चौधरींनी पत्नीविषयी लिहित असताना कुठेतरी त्यांच्या पत्नीने जे दु:खात-सुखात त्यांना साथ दिली होती. यांची उजळणी ते करत असल्याचे दिसतात. त्यांच्या पत्नीवर ऐवढा मोठा दु:खाचा डोंगर कोसळला होता तरी त्यांनी धिराने साथ देत होत्या. त्यांच्यासाठी नवस करत होत्या. त्यांच्या मायेने समजावत होत्या. होणारे भास हे सर्व त्यांना मनाचे खेळ आहेत हे सांगत होत्या. त्यांनी पैसे साठवावेत म्हणून त्यांना बोलत, पण जेव्हा अडचण आली त्यावेळी हातातील बांगड्याही काढून दिल्या होत्या. ऐवढे सर्व सुखाचे असताना त्यांच्या वेडाने मात्र

त्यांच्या पासून हिरावून घेतले याचे त्यांना दु:ख होते. येथे आपल्या कुटुंबाविषयी त्यांच्या मनात असलेल्या प्रेमाचा झरा दिसत आहे.

३.४ या पत्रामध्ये चौधरी यांची मानसिकता दिसते. जेव्हा पत्नी आपल्यासाठी नवस करते त्याशब्दांची आठवण होते आणि त्यांचे मन भरकटते त्याच शब्दाची पुनरावृत्ती करतात. त्यांच्या असणाऱ्या अनेक इच्छांची आठवण होते. त्यावेळी त्यांच्या मनाचा तोल घसरतो आणि दैव-भ्रम-चक्कर-भास-वेड यांच्या चक्रात अडकतात. विचार करत असताना व भूतकाळातील आठवणी लिहिताना त्यांचा परिणाम जाणवतो कुठेतरी मध्येच फुलांच्या रंग, रुपाचे वर्णन करतात. जेव्हा त्यांना शुद्ध येते तेव्हा त्यांच्या तोंडून उदासीन सुर निघतो. तीस वर्षात ज्या 'अव्यक्त' मनाला 'तो' ला दडपले होते. तो उफाळून येतो. आणि सुरु होते ते 'तो'शी दोन हात करणे. त्यावेळी त्यांचे रात्री अपरात्री कुणाजवळ ही जाऊन रडणे, 'मला काही समजत नाही' अशा वेड्यावाकड्या अर्थाचे बोलणे चालत होते. यांची त्यांनाही जाणीव नव्हती. ज्यावेळी जाणीवेत येतात त्यावेळी आपण कसे वागलो सर्व सांगत. त्यावेळी आपल्या वागण्याची लाज त्यांना वाटत असे. त्यानंतर पुन्हा सुरु होई: विचार आणि नंतर 'ये'रे माझ्या मागल्या सुरु होऊ. त्यासाठी उदाहरण देतात झोपेत चालणाऱ्या माणसाला खड्यात पडण्याची हौस नसते पण ते होते सर्व तो झोपेत असल्यामुळे म्हणजेच गणेश चौधरी यांच्या मानसिकतेचा विचार करत असताना त्यांच्या जाणीव व नेणीव मनाचा चाललेला संघर्ष दिसतो आहे.

**४.१ हे पत्र दिवाकर चौधरी यांना गणेश 'दा'ने दि. १६ जुलै १९६९ रोजी लिहिले.**

४.२ या पत्रातून ते लिहितात, दिवाकर, पेमा, जगू यांची पत्रे मिळाली. मात्र त्या लेखनात असलेल्या त्रुटी सांगतात. त्यांची मनस्थिती चांगली असल्याचे ही ते लिहितात. भेटीच्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पाठवत नाही याचे दु:ख ते व्यक्त करतात. अंजलीचे १० वी उत्तीर्ण झाल्याचे समजल्यावर अभिनंदन करतात.

४.३ गणेश चौधरी यांचे वेगळेपण या पत्रातून दिसते. येथे कुठही त्यांना आपल्या मानसिकतेबद्दल लिहित नाहीत. आता जाग आल्याचे ते सांगतात. तसेच आता आपल्यापासून कुणालाही त्रास होऊ नये यासाठी खबरदारी म्हणून ते वासुदेवदादांना पत्र

पाठवत नाहीत. त्याचबरोबर भटूचं पत्र मिळाल्यावर वाचून ते मनसोक्त रडतात. येथे त्यांच्या स्वभावाचा असलेला वेगळा पैलू दिसून येतो.

४.४ या पत्रात आपल्या मानसिकतेचे कुठेही दर्शन होऊ दिले नाही. आता ते पूर्ण जाणीवेत आहेत. आता त्यांनी स्वत:वर बंधने घातली आहेत. त्यामुळे लेखनकरत असताना आपल्या भावनिकतेचा पसारा घालत नाहीत. येथे त्यांच्या वेगळ्या भावविश्वाची जाणीव होते.

**५.१ ती दादांना गणेश चौधरी यांनी दि. २४/०८/१९६९ रोजी पत्र लेखन करतात.**

५.२ या पत्रातून दादांच्या भेटीची अपेक्षा व्यक्त केली आहे आणि नेहमी पत्र लिहावित असे सांगत आहेत. आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांना पूर्ण जाणीव आलेली आहे. नेणीव - जाणीव, सुप्त-अर्धसुप्त, विकृत-प्रवृत्त मनाचे खेळ त्यांना समजले आहेत. पुर्ण शुद्धीवर आल्यामुळे आपल्याला लोकांच्या बोलण्याचे व सत्याचे भान आले असल्याचे सांगतात. एक त्रिवार सत्याची जाणीव ही त्यांना झाली आहे. ते म्हणजे आपल्याला वेड लागणे अटळ होते. त्यामधून त्यांची सुटका नव्हती. हे जे कृत्य घडले ते घडले नसते तर दुसरे कोणते कृत्य घडणार यांची त्यांना संपूर्ण जाणीव झाली होती. तसेच आपल्या नेणीवेतील अवस्थेबद्दल ते लिहितात. त्याला कारणीभूत असलेले एकाकीपण आहे. तसेच त्यांच्यावर हसणाऱ्या व्यक्तिविषयी लिहितात आणि दादाच्या भेटीची अपेक्षा मनात धरतात. म्हणजे हे पत्रलेखन करत असताना संपूर्ण मोहमायाशी नाते तोडून ते लेखन करतात.

५.३ या पत्रातून चौधरी लेखन करत असताना आपल्याला जाणीवेत आल्यानंतर नेणिवेतील अवस्थेचे चित्रण करतात. त्यांनी सत्याचा स्विकार करताना दिसतात. आणि हे शापमय 'काचेचं मन' त्यांना आता कळू लागले आहे. आता आपल्याला या वेडातून हळू-हळू जाग येऊ लागल्याचे सांगतात. येथे त्यांना दादाना आधार, दिलासा देण्याचे काम या पत्राच्या माध्यमातून करतात. अत्यंत निर्विकारपणे आपल्या मृत्युविषयी सांगतात. आपण मेल्यावर आपल्यावर रडणारे कोणी नाही. पण आल्यावर हसणारी माणसे आहेत. याची ही खंत त्यांना वाटत नाही. हे सत्य सांगून त्यांना आता निर्विकार मनाने जायचे आहे. त्यांनी सत्य कितीही कटू असले तरी ते सांगत आहेत. व्यक्त जाणीव मनाला दडपून टाकल्याने त्यांचा स्फोट होऊन जे आतापर्यंत अभद्र, अश्लिल, विकृत विचारांचा प्रचंड प्रवाह सुरु

होऊ ते आपल्या अवस्थे संदर्भात लिहितात "....आधीच माकड, तशात मद्यप्याला, अन् नंतर त्याला विंचू चावला तर त्याच्या मर्कटचेष्टांच, धिंगाण्याचं अन् मन:स्थितीचं वर्णन कुणी करावं? तसंच झालं होतं."[५]

चौधरी म्हणतात याही पुढे जाऊन माझी सकाळ होई ती दवाखाण्यात जाण्यासाठी अनेक दवाखाण्यात त्यांनी स्वत:ला तपासून घेतले. त्यांचा काही उपयोग झाला नाही. शेवटी संध्याकाळ झाली की माझी ओढ वाढत असे म्हणतात. म्हणजे येथे मानसिक स्थितीत चौधरी यांच्या मनाने तयार केलेला एक गोल वर्तुळ त्यातच फिरत होते. या पत्रातून आपल्या ते जाणीव व नेनिव स्थितीचे वर्णन करतात. त्यामध्ये चालले त्यांची ससे होलपट्टीचे रेखाटन ते स्पष्ट सांगत आहेत. आपल्या वडिलांनी सातपुड्यासारखा पहाडी बाप हे दु:ख कसे सहन करतो याचे त्यांना आश्चर्य वाटत आहे. आपल्या दु:खाने तो हादरल्याची जाणीव त्यांना आहे. म्हणजे चौधरी जाणीवेत आल्यावर त्यांना जाणवणारे दु:ख ते स्पष्ट शब्दांत लिहिताना दिसतात.

५.४ या पत्रामध्ये लिहिताना काही ठिकाणी मानसिक घसरण होते आहे. त्यांना गांधीजी सुद्धा मेणाची बाहूली वाटतात. आपल्यासारखाच त्यांनी अन्याय सहन केला. कोणी दबेल तसे दाबले आहे असे सांगतात. त्याचप्रमाणे त्यांना वंदनीय वाटणाऱ्या व्यक्तिच्याही मेणाच्या बाहुल्या होतात आणि वंदनीय स्त्रीयांचे अवयव्य हावेत भिरकावतात हे असे वाटते त्यांच्या ठिकाणी सुप्त मनात दडलेल्या मनोविकृतीचा प्रत्यय आहे. त्यांच्या भवती चक्रवणारे शब्दांचे अखंड जाळे ते सांगतात नेनिव मनाबद्दल विवेचन करतात, "रानास लागणारा वणवा प्रचंड वाऱ्याच्या झोतानं चंदन व बाभूळ यांच्याकडे ढुंकूनही न पाहता त्या दिशने झेपावून क्षणार्धात भस्मसात करतो, तसंच हे नेणीवमन सुप्त मन समोरच्या प्रत्येक सजीव वा निर्जीव वस्तूचे अर्थ बदलवून व ते माझ्यावर लादून चक्रावत आवाजाच रोखानं पळत सुटे व त्यांची राख करी गाडं..XX.., ताक... XX.., दुध.. XX..., कणिक...... XX व इतर शेकडो शब्द निरर्थक अत्यंत विकृत अर्थ व तशी प्रत्यय 'प्रतिमा' डोळ्यासमोर भिरभिरत राही व त्याचे शेकडो आवर्तनं घेत....... असे शेकडो शब्द शेकडो अर्थ व प्रतिमा व शेकडो आवर्तनं एखाद्या वेगानं फिरणाऱ्या पंख्यासारखी फिरत राहत."[६]

पुढे दादाना म्हणतात उठल्या क्षणापासून विचाराचे, भास, भ्रम, सुप्त, अर्धसुप्त चे चक्र चालू होई. आपल्या जवळच्या व्यक्ती आपल्याला काहीही बोलतात हा संशय घेत. रविदादा, एकनाथदादा त्यांना कधीतरी बोलत आहेत हा भ्रम सतत त्यांच्या मनात असल्यामुळे त्यांच्या मानसिकतेत आणखी वाढ होत असे. म्हणजेच भयंकर भिती व संशय मनात बाळगल्यामुळे त्यांच्या मनाचे होणारे हे भ्रम होते.

**६.१ गणेश चौधरींनी हे पत्र ती दादांना दि. १८/०९/१९६९ रोजी लिहिले आहे.**

६.२ या पत्रातून एस. एस. सी. च्या निरोप समारंभाचे वर्णन करतात. येथे त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करतात. आणि आपण दिलेली शिदोरी त्यांना उपयोगी आहे. व त्यांनी परीक्षेसाठी शुभेच्छा देतात. त्यानंतर लिहितात त्यांना प्रदीर्घ झोपेनंतर त्यांना या सर्वांची चांगली आठवण आहे. एस. एस. सी. च्या निरोपसमारंभानंतर रिकाम्या वेळेत कथालेखन करतात. ती दादांनी वाचावी अशी अपेक्षाही करतात. त्यांना शाळेच्या कामाविषयी असलेली गोडी विषयी लिहितात. आपलं शाळेतील काम झाल्यानंतर दुसऱ्याला मदत करण्याची त्यांची सवयी विषयी लेखन करतात. तसेच या पत्रातून ते आपल्या वेडामुळे शरीर कसे कुमकुवत झाले. त्यांना येणाऱ्या चक्करविषयी ते सांगतात तरी स्वत:ला सावरण्याचा त्यांनी केलेल्या प्रयत्न या विषयी ही विवेचन करतात. वेडाच्या भारात त्यांनी मनात येणारे व्यभिचार, त्यावरुन त्याचा वाढणारा संताप, स्वत:च्या अशा वागण्याविषयी वाटणारी लाज या विषयी सांगतात. लोकांचे काहीही बोलणे, त्यांना लागलेल्या डॉक्टरांच्या व्यसनाविषयी लिहितात. सर्वात वाईट वागले ते दिवकारच्या लग्नाच्यावेळी, त्यावेळी त्यांनी शाळेतही काम केले नाही आणि घरी ही काम केले नाही. यांचा त्यांच्या मनाला होणारा त्रास ते सांगातात या पत्रातून ते दादांना आपल्या चुकीच्या वागण्याबद्दल माफीही मागत आहेत. हे पत्र त्यांची पूर्वीच्या स्पष्ट आठवणीतून लेखन केले आहे.

६.३ या पत्रातून गणेश चौधरींचे जसे आपल्या कुटुंबावर प्रेम करत होते त्यापेक्षाही जास्त आपल्या विद्यार्थ्यांवर करत असल्याचे दिसतात. १० वीच्या निरोप समारंभाच्या वेळी त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगतात, ''आज माझी स्थिती झालीय त्या वृक्षासारखी ज्याच्या वृक्षावर पाखरं आली, खेळली, कुजबुजली, मधुर गीते गायली, देहभान हरपली, अन् त्याला तिथेच विसरुन ऐक दिवशी अचानक दुरदूर निघून गेलीत

कुणीसं म्हटलंस, 'अशी पाखरे यते आणि स्मृती ठेवूनी जाती' - मला तुमच नित्य स्मरण राहील जा माझ्या पाखरांनो जा मोठे होण्यासाठी जा आणि मोठे होऊन या. रुंदावलेल्या क्षितिजाला गवसणी घालण्यासाठी जा. आम्ही जर कुठे थिटे पडलो असू तर क्षमा करा... यशस्वी व्हा.''[७] आपल्या विद्यार्थ्यांच्यावर मुलाप्रमाणे माया ते करत होते. एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांनी नाव लौकिक मिळवलेला होता. ते सर्व त्यांना इतक्या वर्षांनी लख आठवत आहे. त्यांचा हा निरोप शेवटचा ठरलेला होता. यांनंतर रिकाम्या वेळेत त्यांचे विचार चक्र सुरु होई. यातुनच 'केळ-कमळ' कथा जन्माला आली. येथे त्यांच्यामध्ये लेखकांचे गुण लपलेले या कथेने त्याकाळात वर काढले पण त्याला पुर्ण वाव मिळाला नाही. शाळेत नेहमी दुसऱ्याला मदत म्हणून त्यांचे विषयी शिकवणारा, आपल्या कामात कायम चोखपणा ठेवणारे गणेश चौधरी मे-एप्रिलच्या महिन्यात त्यांची मानसिकता संपूर्ण ढासळली आहे. त्यांना स्वत:चे काम करणे ही जड जाऊ लागले आहे व वेडाचा परिणाम त्यांच्या शरीरावर झाला आहे. त्यांना आठवत नसल्यापासून त्यांनी अनेक डॉक्टरांना दाखवले आले पण डॉक्टरांनी सांगून सुद्धा अनेक टेस्ट व दवाखाण्यात अडमिट करावे म्हणून त्यांचा हट्ट असे. यावरती त्यांना अनेक डॉक्टर रागवले होते. हे सर्व त्यांनी केलेल्या मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे होत होते. डॉक्टर आपल्याला आधार देण्यासाठी असे बोलत आहेत अशी त्यांची समजूत होई ते आपल्या व्यभिचाराविषयी आणि आपल्या रागाविषयी त्यांना स्वत:चा राग येई ते दिवाकरच्या लग्नाच्या वेळची परिस्थिती सांगतात. ते सांगतात की, ''काम' सांगण्याची मला कुणाचीच हिम्मत नव्हती! तथापि जे 'काम' निदान दिवाकरच्या लग्नाचे मी करावयास पाहिजे होते ते मी दादा, स्पष्ट लिहितो, माफ करा, तुमच्यावर व निळूवर लोटीत होतो! क्रोकरी, खरेदी इत्यादी इत्यादी. तुमच्या चांगुलपणाचा फायदा व माझं 'बर नाही' चं कुंथणं, असा हा घोटाळा होता! निळूचा आधार! तुमचा आधार! (पुढे लग्नात - काकांचा आधार! पेमाचा आधार! पुर्सोदादांचा आधार!) मला लपायला जागा नव्हती. नव्हती. जिथे लपून राही व नेणिवेच्या प्रचंड वावटळीत भिंतीत घुसळून निघे-तिथुनही मला 'बाहेर' खेचण्यात येई व मी जाणिवेत आलो की छे! हे आपल्याला शोभत नाही म्हणून आत्मनिंदा करी! कुणावर रागवण्यापेक्षा स्वत:ला लपविण्याची प्रवृत्ती जास्त.''[८]

शाळेतही त्यांच्या विषयी कुचिंतपणाने बोलले जात असे. त्यांच्या कामाविषयी, आणि लग्नातील तोंड घाई विषयी सहकारी शिक्षक बोलत त्यावेळी त्यांच्या मानसिकतेचे वर्णन ही करतात. त्याचबरोबर सितारामच्या दहाव्याच्या वेळी अर्धजाणिवेचे आणि नेणिवेचे आंदोलने लिहितात. येथे ते आपल्या कृत्याचा कबुली जबाब देण्यासाठी पत्र लिहिताना दिसतात. येथे त्यांच्या स्वभाग गुणवैशिष्ठ्याचे वेगळेपण वाचकांना जाणवते आहे.

६.४ या पत्रातून दादांना त्यांच्या मनोविकृतीची सुरुवात कशी झाली या विषयी लिहितात. १० वी च्या निरोप समारंभानंतर त्यांना मिळालेला मोकळ्या वेळेत त्यांनी विचार केला. ते आपल्याला होणाऱ्या भास, भ्रम यांचे त्यातून वाढत गेलेल्या चक्कर आणि त्यातून मनोविकृतीचे अखंड चक्र चालत असे. कानावर पडलेल्या शब्दांचा विचार करत बसणे. फेब्रुवारीमध्ये त्यांना संपूर्ण मेंदू सडला होता. हे वाढत असताना त्यांना कधी शिक्षण सांगण्याची गरज भासली. त्यांनी त्या पत्रामध्ये अर्धजाणीवेतील प्रसंग सांगतात, "...असाच शून्यपणे १० वी च्या वर्गात शेवटचे दोन तास बसून होतो मी तर वर्गात असून नव्हतो. डोळ्यासमोर वेगळंच थरणारं विलक्षण - आणि मला एकदम वाटलं कुणीतरी मुलानं कुणाला तरी आईवरुन शिवी दिली. 'शिवी' मला 'दिसत' होती हे केवढं दुदैव! बस! मी मुलींना लगेच घरी पाठवलं (शाळा सुटायला थोडाचं वेळ उरला होता!) आणि शिवी कुणी दिली म्हणून विचारल मुलांना! कुणीच उभं राहिलं नाही! उलट मला ते बुचकळ्यात पडल्यासारखे वाटले! पुढच्या रांगेतील मुलगा तीच शिवी उच्चारीत - कुजबुजत जवळच्या विद्यार्थ्याला म्हणला, 'सर असं विचारताहेत!' माझी खात्री (!) झाली पण कुणीच उठेना! त्याच मुलाला विचारलं तर तो म्हणाला, 'मला माहित नाही सर!' (भास-चक्कर-काचेचं मन!) सर्व विद्यार्थ्यांना खरं बोलत नाही म्हणून व शिवी दिली म्हणून, माझ्यासह १५ मिनिटं शाळासुटल्यानंतरही उभं रहावं अशी शिक्षा दिली."[९] येथे चौधरींचा नेनिवेतील मनाशी चाललेला संघर्श ते सांगतात. त्यांचे अर्धजाणीवेत ओरडणे, त्याविषयी त्यांच्या मनाची होणारे तगमग ते सांगतात. त्यांचे डॉक्टर बदलणे हे त्यांच्या मानसिक विकृतीचे दर्शन घडवते. दिवाकरच्या लग्नाच्यावेळी त्यांचे मनोविकृत वागणे. सर्वांपासून तोंड लपवून बसणे. आणि शेवटी सीतारामबांच दहाव्याच्या वेळी पिंडदान केले जाते. त्यावेळी त्यांचे

विचित्र अवयव्य होणे ही त्यांची मानसिक विकृती होती. येथे प्रत्येक आठवणीत त्यांनी आपल्या मनोविकृत्ती सांगतात. त्यासाठी वापरलेली भाषाही त्यांच वळणाची असलेली आहे.

**७.१ गणेश चौधरींनी हे पत्र ती दादांना दि. ५/१०/१९६९ ते ८/१०/१९६९ या दोन टप्प्यांत लेखन केले आहे.**

७.२ ती. दादांना या पत्रातून दिवाकरच्या लग्नाच्या आदल्या दिवसापासूनच्या मानसिक अवस्थे संदर्भात सांगतात. आदल्य दिवशीच्या जाग्रणाच्या वेळी त्यांना होणारे भास, त्यावेळी माणसांची जेवण बाबांनी दिलेली टोपी आणि तुषारचे गुलाल लावणे, ते सांगतात मी ओठा सोडून खाली उतरलोच नाही. त्यांना त्यावेळी येणारी चक्कर-भास-भ्रम या भवऱ्यात ते अडकले होते. त्यावेळी शाळेचा रिझल्ट लागला होता. नापासांची संख्या खुप होती. पण त्यांचा काही परिणाम झाला नाही. ते लिहितात लग्नात काम तर करत नव्हतोच पण त्यावेळी 'माझी तब्येत ठीक नाही हे ठूमणे त्यांचे सुरु होते' ते इदगावला पहिल्या ट्रीपन जातात आणि आश्रम शाळेत आधारासाठी सामानावर बसतात. आणि तोंड लपविण्यासाठी मंडपात सर्वात शेवटी जातात. त्यावेळी त्यांची नवरदेवाचा भाऊ म्हणून सर्वजन थट्टा करतात पण स्वत:ला लपविण्यासाठी त्यांची आत्मवंचना चालली होती. त्यांचे जळगांवचे सर्व मित्र आले. पण त्यांची विचारपूस करत नाहीत. समोर कोण आहे याचे भान त्यांना नव्हते. त्यामुळे शुद्धीत आल्यानंतर वाटणारी लाज आणि स्वत:ची घृणा येत असे. आपल्या या अवस्थेबद्दल ते पुर्सोदादाला सांगतात. पण लग्नाच्य दगदगीत होते अशी त्यांची बोळवण केली जाते. ते पुढे लिहितात त्यांचे हे वेड वाढत जात होते. ते लपवण्यासाठी आधारासाठी जागा शोधीत असत ते सांगतात. पहिल्याच नवरदेव-नवरीच्या ट्रीपन घरी येऊन शच्चीवर ते झोपतात. त्यावेळीची त्यांची अवस्था लिहितात. या पत्रात ते स्वत:शीच आपल्या वेडा संदर्भात बोलतात. अर्धजाणीव आता संपूर्ण नेनिवेत जाणार तो आपल्यावर हामी होतो याचे त्यांनी संपूर्ण वर्णन केले आहे. चौधरींच्या या पत्रात आपल्या वेडाची सुरवात आणि संपूर्ण वेडा केव्हा झालो हे लिहितात. 'तो' त्यांच्यावर संपूर्ण कब्जा घेतो. त्यावेळी त्यांना होणारे भास, आकृत्या त्यांना निर्माण होणारा संशय या सर्वांचे वर्णन ते करतात. 'तो'चे प्रलंयकारी, भयंकारी रुप या संदर्भात सांगतात यानंतर या वेडातून सोडवणारा तो देवमाणूस होता तसेच त्यांना 'तो' हा त्यांच्या मनाच्या दोन व्यक्तिमत्वातील एक होता याची

जाणीव करुन देतात. आता त्यांनी दि. ८/१०/१९६९ या दिवसापासून आणि गणेश रहाण्याचे ठरवितात. 'तो'ची वेगवेगळी रुपे सांगतात. यानंतर ते लिहितात या 'तो'चे अस्तित्व ते असे पर्यंत संपणार नाही. आणि पुढे या शेवटी त्यांना मानसिक तोल ढळलेला आहे. आणि कोणीही काहीही बोलतात या सारखे बडबडणे त्यांनी लिहिलेले आहे. पत्र लेखनात त्यांच्या मनाचा तोल कधी ढासळलेला आहे तर कधी सावरण्याचा प्रयत्न ते करताना दिसतात. आणि शेवटी ते लिहितात ते हे मी जे लिहित आहे अश्लिल असले तरी त्यांच्या जीवनातील कटू सत्य आहे.

७.३ या पत्रलेखनाची सुरुवात ते दिवाकरच्या लग्नाच्या आदल्या दिवशीच्या जागरणाने करतात. पण मध्येच त्यांचे वेड उफाळून येते आणि ते त्यासंदर्भात आवर्तनामध्ये लिहितात. लगेच ते भानावर येतात आणि पुढचा प्रसंगासंदर्भात लिहितात. येथे त्यांचे आपल्या मुलाबद्दलचे प्रेम व आपल्या मुलाची आठवण ही येते. त्यानंतर ते लग्नाच्या दिवसाचे प्रसंग सांगतात. येथे हे सांगत असताना चौधरी यांचे मनाचे संतूलन किंवा त्यांना जसे आठवेल ते ते लिहितात मध्ये मध्ये आवर्तनात त्यांच्या वेडासंदर्भात ते लिहित जातात. हे सर्व सांगताना त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता सत्य ते सांगत आहेत. येथे एक मनोरुग्ण व्यक्ती आपल्या मानसिक अवस्थेत त्यांना कोणता त्रास होत होता या संदर्भात लिहितात या पत्रातून चौधरी यांचे आपल्या वेडामुळे स्वत:चा राग येतो आणि लाज ही वाटते. चौधरींच्या ठिकाणी असलेली स्पष्टता हा गुण दिसून येतो. एक मोठा भाऊ किंवा मुलगा म्हणून आपण आपली कर्तव्य पार पाडली नाहीत यांचे त्यांना झालेले दु:ख ही ते लिहितात. ते कोणतेही काम दुसऱ्यावर ढकलून रिकामे होत असतं. ऐवढेच नाही तर आपले मित्र मंडपाबाहेर जेवण करत असताना बघून त्यांना दु:ख होते. पण त्यांना या वेडाच्या चक्कर आणि भास, भ्रम त्यांना काही सुचून देत नव्हते. ते सांगतात नवरदेव नवरीच्या पहिल्या ट्रिपमधून घरी येऊन ते गच्चीवर झोपतात. त्याचबरोबर या वेडामध्ये त्यांना 'तो' चे जाणवलेल्या अस्तित्वा संदर्भात लिहितात, "…..आणि आजपासून त्या वेड्या व्यक्तिमत्वाला 'तो' म्हणजे ते वेडं वेडं व्यक्तिमत्व - तुझ्याच नावांनं - 'गणेश' नावांन वावरणार होत! भयानक वेडात भ्रम-भास-चक्कर आणि नेणिवत नुसत्या आवाजाच्या रेखानं धावून - ज्यांच्या पायाचं तीर्थ तू आजवर घेत होतास त्यांना शिव्या देणार होतास! ज्यांची शिवी तू

ओवीप्रमाणे मानीत होतास ज्यांच्या प्रेमामृतान तू न्हाऊन निघत होतास त्यांना अपशब्द देणार होतास - सर्व सर्वांची मेणाची बाहुली करणार-होणार होतास. ''[१०] येथे 'तो' च्या संदर्भात ते लिहितात, वेडातून बाहेर आणणाऱ्या मानसास देवमाणूस समजतात आणि हे वेड आपल्यावर कब्जा करणार आता आपण गणेश म्हणून राहण्याचे ठरवले आहे असे सांगतात. हे पत्र लिहिताना त्यांच्या लेखनीत असलेल्या प्रांजळपणा आणि चुकीची कबुली करणे आणि कोणत्याही प्रकारची लाज न वाटता ते माफी मागतात हे त्यांच्या स्वभावाचे विशेष गुण दिसतात.

७.४ या पत्राच्या सुरवातीस त्यांची मनाविकृती दिसून येते. ती जाग्रणाच्या वेळी त्यांच्याकडे 'कणिक' संभाळण्यांच काम घेतात. त्यावेळी त्यांच्या भोवती सर्व वस्तु फिरत होत्या. त्यावेळी जाणीव व अर्धजाणीवेच्या भोवती फिरत होते. त्यावेळी त्यांना जाणवणारे चक्कर, भास, भ्रम सुरुच होते. नंतर जाणीवेत आल्यावर आपल्या अवस्थेबद्दलची आत्मवंचना सुरु होई. त्यानंतर नेनिवेत जात त्यावेळी त्यांना आधाराची गरज होती. ते भ्रमामध्ये आपण कोणत्या व्यक्तीबरोबर काय बोलत आहोत याचे भान त्यांना नसे. त्यांना दुसरे कोणी समजून बोलत असत लग्नाच्या वेळी जेवण करत असताना जेवताना कोणत्याही रस नसल्यासारखे जेवण करत होते. आपली ही अवस्था लपवण्यासाठी ते पहिल्या ट्रीपने घरी येतात. आणि गच्चीवर झोपतात त्यावेळचे विवेचन करताना लिहितात, ''.....गच्ची फिरत होती....तारे तुटत होते.....सर्व आवाज .....आवाज....समजेना काय हे....... आणि मी जड अचेतन...मुढ झालो होतो......तरीही मी क्षणाक्षणाला स्वत:भोवती वेगवान वावटळीप्रमाणे फेऱ्या घालत होतो......मुंग्या.......हातापायांत शक्तीच नव्हती ......'लोक' काहीही म्हणत होते......फक्त....दुरदुरुन.....आवाज.....आवाज....शेकडो फेरे.......शेकडो आवर्तनं!....नालायक आहे तू.......XXआहे तू.......XXX वेडा आहे तू........ XXXX शेकडो शेकडो आवर्तनं....प्रत्येक शिवी शेकडो आवाजात मला 'दिसत' होती. आणि मी पाहत होतो.......किळसवाणं......ओंगळवाणं.....करुप.......किंचाळत होतो.......पण आवाज फुटत नव्हता......नाऽही... ना ऽ ही.... साल्या.....मी दोन थोबाडीत देईन आता........कुणी काही म्हटलं तर ही पहिली प्रतिकाराची भावना नेनिवेत ठसली.....आणि .......आणि मी वेडा वेडा झालो........''[११]

त्यांच्याबरोबर 'लोक काहीही बोलतात' हा संशय त्यांना येत असे. त्यामुळे एक दिवस आंघोळ करताना ओरडत बाथरुममधून बाहेर येतात. आणि मोठ-मोठ्योने बोलणे तसेच वेडात धाडसी संभोग घेणे. अशा अनेक विचित्र अवस्थेचे लिखाण करतात. येथे त्यांच्या पत्रातून मनोरुग्णातेचा प्रत्येय येत जातो.

७.५ या पत्राविषयी म. वा. धोंड लिहितात की, "नेनिवेतल्या प्रलयकारी वादळात स्वकीयांना स्वहस्ते पारखा झालेला, होरपळलेल्या जीवाद्वारा या पत्रांमधून ते कळवळून मला काय त्रास होत होता, हे कोणताही आडपडदा न ठेवता डॉक्टरला, कुटुंबीयांना जीव तोडून सांगत होते. परंतू मानसोपचारतज्ञही लक्ष देत नव्हते. कुटुंबीयांना कळत नव्हते. क्षणोक्षणी जाणिवेचा नि:पात होत चाललेला. परंतू तो नि:पातही ज्यांच्या लक्षात येत नाही मात्र आपल्या आजारांची लक्षणे विस्तृतपणे त्यांना मांडता येतात, तीच त्यांनी या पत्रातून मांडलेली आहेत."[१२]

**८.१ गणेश चौधरींनी हे पत्र त्यांनी त्यांच्या ती. सौ. आईस दि. २५/१०/१९६९ रोजी लिहिलेले आहे.**

८.२ चौधरींनी मनोरुग्णालयात गेल्यापासून हे पाहिलेच पत्र आईस लिहिले आहे. या पत्रातून मातृप्रेम व्यक्त होते तसेच आपल्या आईने आपल्यासाठी घेतलेले कष्ट तिने सहन केलेले हाल याचे ऋण व्यक्त करतात. आई त्यांच्यासाठी महादेवाची उपासना करते. पण चौधरी मात्र आईची पुजा करत आहेत. येथे वेडातून प्रथम जाग आल्यावर आईला पत्र लिहिण्याचे ते धाडस करीत आहेत. येथे त्यांच्या मनाची बैचेन अवस्था झालेली दिसून येते. 'शिक्षा कमी झाल्याचे' समजताच अस्वस्थता आणखी वाढत गेली आहे. ही जगण्याची शिक्षा मिळाली ती परमेश्वराने दिलेली शिक्षाच होती. आपल्या प्रिय व्यक्तीच्या आठवणीत झुरण्याची आणि आपण केलेल्या कृत्याची जाणीव म्हणून त्यांना जगण्याची शिक्षा शंभो महादेवाने दिलेली आहे. आणि पुढे लिहितात सुप्रीम कोर्टात आपील करण्यापाठीमागे त्यांना आपल्या नग्न, काचेच्या मनाची शोकांतिका मांडायची होती. त्यांना जगण्याचा हव्यास नव्हता, तसेच त्यांनी १५/१०/१९६९ रोजी अत्यंत गोंदळलेल्या अवस्थेत पत्रलेखन केले आहे. त्याबद्दल ते क्षमाही मागतात. विवेक विषयीचे प्रेम, यांच्या खेळाविषयी लिहितात.

आता पुढे मात्र निरभिडपणे जगण्याचा ते निश्चय करत आहेत. यासाठी आईच्या आशीर्वादाची अपेक्षा करतात.

८.३ या पत्रातून गणेश चौधरींचे मातृप्रेम आणि पितृप्रेम व्यक्त होते. येथे आपण पत्र का पाठवत नाही याचे विवेचन करतात. आणि याबद्दल क्षमा ही मागतात. ते आईला म्हणतात माझ्या या शापित जीवनवाटेवरची तू पाणपोई आहेस. त्यामुळे त्यांच्या जीवनाला एक वेगळा अर्थ प्राप्त झाला आहे. येथे ते लिहितात मी पुढच्या कोर्टात आपील केले ते माझे वेड सिद्ध करण्यासाठी मी वेडा आहे आणि वेडामुळे माझ्या हातून काय हरवले आहे हे सांगण्यासाठी पुन्हा केस सुरु करत आहे. या दु:खाने ते व्याकुळ ही होताना दिसताता. विवेकमध्ये आपल्या तुषारचे प्रतिबिंब पाहतात आणि तुषारच्या आठवणीने व्याकुळ ही होताना दिसतात. पण या सर्व दु:खानंतर जगण्याचा द्रुड निश्चय करताना दिसतात. येथे त्यांच्याकडे दु:खाला सामोरे जाण्याचा त्यांचा स्वभाव गुण विशेष दिसून येतो.

८.४ हे पत्र लिहित असताना त्यांची मनोविकृती कोठेही दिसून येत नाही. संपूर्ण जाणीवेत असताना हे पत्र लेखन केलेले आहे. येथे त्यांच्या हळवे भाव आणि कर्मठ विचार व्यक्त झालेले दिसतात.

**९.१ हे पत्र चि. सौ. कल्पनास गणेश चौधरींनी दि. १७/११/१९६९ रोजी लिहिले.**

९.२ या पत्रातून ते कल्पनाला आपण पूर्ण शुद्धीत असेल तरच तुला पत्र लिहिणार आहे असे सांगतात. तसेच दिवाकरवर ते रागावू शकतात. किमीत कमी ते वयाने त्यांच्या पेक्षा मोठे आहेत म्हणून तसेच आपल्या संभ्रमावस्थेत जे घडले आहे. त्या सर्वाची आठवण ठेवूण जाणीवते शुद्धीवर आल्यावर त्याबद्दल कोणतीही उकल न करता ते सहन करीत आहेत. 'तो'च्या ओंगळ वागणे. तुमी भेटण्यास येता तेव्हा मी कसा ही वागतो. ते 'तो' करत असतो असे लिहितात. त्यांना सर्व सामन्याप्रमाणे कव्हरचे झाकलेले मन पाहिजे होते पण त्याना न मिळाल्यामुळे त्याची ही शोकांतिका झालेली आहे. आणि 'आपल्याला लोक काहीही म्हणतात' याचे सतत बोलणे या संदर्भात ही लिहितात. 'तो' न ऐकता माझे ऐकावे अशी विनंती ही करतात. आणि त्यांच्या 'काचेच्या मनाकडे' व्यक्तीगत न पहाता मानसशास्त्रीय दृष्टीने पहावे. या देहावर अनेक ट्रीटमेंट करुन आखील मानवजातीसाठी उपयोगात आणावा. माझ्या कव्हर/आवरण नसलेल्या मनाला झाकण्याची गरज आहे. तसेच ज्ञात-

अज्ञात प्रतिमांची त्यांच्या जीवनावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करता येतो. ते पुढे लिहितात मला असे स्वत:चे खाजगी काही राहिले नाही. सर्व सार्वजनिक होऊन गेले होते. आणि पुढे 'लोक म्हणतात' या दोन शब्दांची पुनरावृत्ती होते. येथे या 'तो' कितीही अभद्र असलातरी त्याचे संपूर्ण उकल त्यांनी करायची आहे.

९.३ हे पत्र आपल्या भावजेला लिहिताना ते मर्यादा पाळताना दिसतात. तसेच भावाविषयी प्रेम, राग आणि त्यांच्यावर असलेला आपला हक्क ते लिहितात. या संपूर्ण पत्रामध्ये त्यांचे मन निर्भिड झालेले आहे. जीवनाशी संघर्ष करण्यास ते समर्थ झालेले आहेत. पण कधी कधी 'तो' उफाळून येतो. आणि ते भरकटतात. त्यावेळी 'तो'कडे त्यांच्या हातवाऱ्याकडे लक्ष देऊ नका, त्यांच्याकडे लक्ष द्या म्हणून ते सांगतात. हे तुमी माझ्यावर प्रेमामुळे सहन करता याची जाणीव त्यांना आहे. पुढे लिहितात आता माझ्यात सुधारणा झालेली आहे. माझे बोलणे सुधारले आहे. ते त्यांच्या इच्छा व्यक्त करतात, माझ्या मानसशास्त्रीय दृष्टीने उपयोग करुन, सर्व मानवजातीला उपयोगी पडेल असा शोध लावा. त्यांचा त्यांना आनंद होणार आहे. पुढे लिहितात आता मी स्वत:ला फार सावरु शकणार नाही. यावरती काहीतरी पर्याय शोधला पाहिजे. त्यांना लोकांच्याविषयीची ढवळाढवळ नको आहे हवे आहे सुप्त जाणीवेतील मन. येथे त्यांना ज्या वेदना, दु:ख होते ते सांगतात. पण त्याचबरोबर आपलाही उपयोग कोणालातरी व्हावा ही निर्मळ हेतू ही दिसून येतो.

९.४ या पत्रातून त्यांनी 'तो' च्या अस्तित्वाविषयी सांगतात 'तो' चे अस्तित्व आजही त्यांच्या जीवणात आहे. त्यामुळे त्यांना होणारा त्रास व लोकांचे काहीही बोलणे या सर्वामुळे त्यांच्या जीवनात आलेल्या अस्थिरता विषयी सांगतात. 'तो' च्या मुळे लोकांचे अस्तित्व वाढत आहे. त्यांना सावरणे कठीण जात आहे. यासाठी मानसशास्त्रीय दृष्टीकाणातून विचार करावा असे सांगतात. यामुळे ते आपल्या नग्न मनामुळे त्यांना होणारा त्रास त्यांचे असे काही खाजगीजीवन राहीले नाही. याची त्यांना खंत ही वाटते. येथे गणेश चौधरी त्यांची मानसिक अवस्था जेवढी सावरण्याचा प्रयत्न करतात. तेवढीच त्यांना सावरता येत नाही. त्यांना या 'नग्न' मनाचे धागे पिंजण्याचा निश्चय करतात. येथे संपूर्ण जाणीवेत लेखन करतात. पण कुठेतरी 'तो'च्या अस्तित्वाविषयी लिहिताना दिसतात.

**१०.१ हे पत्र गणेश काकांनी प्रिय चि. रमेश यांस दि. १७/०३/१९७० रोजी लिहिलेले आहे.**

१०.२ रमेशच्या लग्नाची वार्ता समजल्यावर हे पत्र लिहितात. त्यावेळी त्यांना तुषारची आठवण होते. त्याला गुलाल लावण्याची हौस होती. ही हौस रमेशच्या लग्नात तो पूर्ण करणार होता. पण त्याआधी वेडामध्ये सर्व हारवून बसले होते. या तीन वर्षात खूप सोसले. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे आणि त्यांच्या इगोमुळे त्यांना हे सर्व सहन करावे लागले होते. जळगावला तर मनोतज्ज्ञच नव्हते. त्यामुळे केसचा निकालही त्यांचे वेड लक्षात न घेता दिला गेला. नागपूरच्या डॉक्टरांच्यामुळेते ह्या शापातून मुक्त झाल्याचे लिहितात. पण या आधीच्या डॉक्टरांच्या घमेंडीमुळे त्यांनी ही फळे भोगावी लागली होती. रमेशला लग्नासाठी शुभेच्छा व शुभाशिर्वाद देतात आणि त्यांच्या रमीच्या मेंबर्सची चौकशी करतात व आपल्या वाटणीचा गुलाल निळु, किंवा दिवाकरला व धनाजीला लावण्यास सांगतात. त्याप्रमाणे लग्नातील फोटोची कॉपी व मिठाईची मागणी करतात व रमेशला लिहिण्यास सांगतात पण त्यांच्यावर राग असेल तर लिहू नकोस म्हणून सांगतात. रमेशच्या लग्नामुळे त्यांना तुषारची व त्यांच्या पत्नीची आठवण होते. तसेच बेबी पहिल्याच वेळी मॅट्रीक पास झाली म्हणून ते अभिनंदन ही करतात. आणि विवेकच्या आठवणीने व्याकुळ ही होतात. आणि येथे सर्वांना शुभाशिर्वाद लिहितात.

१०.३ प्रत्येक व्यक्ती स्वप्न बघत असतो. तसेच काही स्वप्ने चौधरींनी जाणीवेत बघतात. पण ती भंग झालेली पाहून त्यांना झालेली वेदना ते येथे सांगातात. येथे चौधरींनी तुषारबरोबर रमेशच्या लग्नाचे स्वप्न बघितले होते ते रमेशचे लग्नाच्या वेळी त्यांना आठवते. त्यावेळी तुषारच्या आठवणीने त्यांचा जीव कासावीस होतो. तसेच माणूस कसाही असला तरी आपल्या परंपरा, रीती ह्या तो जपत असतो हेच चौधरींनी केले आहे. त्यांना रमेशच्या लग्नातील गुलाल हा आपल्यातील कोणालातरी लावावा अशी अपेक्षा करतात. तसेच आपल्या माणसाच्या पत्राची अपेक्षा ही करतात. येथे ते हक्क सांगताना त्यामध्ये असलेला प्रेमळपणा दिसून येतो. तसेच आपल्या व्यक्तींच्या सुख-दु:खात ते सामील होतात आणि आपल्या प्रिय व्यक्तींच्या दु:खाने त्यांना होणारा त्रासही ते लिहिताना दिसतात.

१०.४ हे पत्र रमेशला लग्नाच्या शुभेच्छा देण्यास लिहित असताना त्यांना त्यांचा भूतकाळ आठवतो आणि मनाचे संतूलन ढळते. ते डॉक्टरांच्यावर आरोप करतात. ते डॉक्टरांच्या विषयी लिहितात, ''केवळ वेडेपणा, शुद्ध मुर्खपणा!! आणि डॉक्टरांचं अज्ञान!! चि. दुलब्याच्या टॉन्सिलच्या ऑपरेशनच्या वेळेलाच मला 'सायक्रॅट्रिक्स'कडे पाठवायला पाहिजे होते! पण आपला पेशंट डॉ. सरोदेंकडे पाठविणे स्वतःच्या क्रेडिटला मानवल पाहिजे ना! कुणी मेलं तरी आम्हाला काय त्याच? पेशंटला काय झालयं हे पेशंटला काय कळत नाही अन् डॉक्टर योग्य मार्ग सांगत नाही! विचित्र घटना जन्मे ती अशी!''[१३] येथे डॉक्टरांच्या इगोमुळे त्यांना सहन करावे लागलेले दुःख सांगताना त्यांचा संताप वाढतो. ते लिहितात आपल्या ऐश्वर्याच्या घमेंडीत 'तुला काही झालं नाही असे बेजबाबदार त्यांचे वागण्याविषयी लिहितात. चौधरींच्या मनात आज डॉक्टरांनी केलेली निष्काळजीपणाची सलं लसत आहे. अणि त्यांनी ही व्यथा येथे सांगतात.

**११.१ गणेश 'दा'ने हे पत्र प्रिय चि. दिवाकर यांस दि. २३/०३/१९७० रोजी लिहिलेले आहे.**

११.२ पत्र लेखनास सुरुवात अत्यंत उदासपणे झालेली आहे. त्यांच्या जीवनात असे काही उरले नाही संपूर्ण जीवन कंगाल आहे आणि स्वतःचा वाटणारा तिरस्कार, घृणा या विषयी लिहितात. तसेच होळीवरुन तुषारची आठवण होते त्यामध्ये भारावून जातात. त्यांना पुन्हा केस सुरु करायची आहे. त्यांना दिलेला हा न्याय त्यांची आवस्था समजून न घेता दिलेला आहे. त्यामुळे त्यांच्यामनावर एक ओझ निर्माण झाले आहे. त्यामूळे अस्वस्थता वाढत आहे. त्यांच्या दुर्दैवाने जळगावला कोणीही मानसतज्ज्ञ नव्हते. पण आता त्यांच्या वेडाची नोंद न घेता दिलेल्या या न्यायाविरुद्ध आता पुन्हा केस सुरु करणार आहेत. त्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे ते जमा करण्यास सांगतात. व मुंबईतील प्रसिद्ध वकिलाला केस समजून सांगण्यास लिहितात. आणि या वेडामुळे त्यांना होणार भास, भ्रम याविषयी लिहितात. तसेच वेड लागल्या पाठीमागे मुख्य कारण म्हणजे एकाकीपणा, आणि विचाराचे चक्र सतत चालू राहिले त्यामुळे त्याचे रुपांतर वेडामध्ये झाले आपल्या वेडाची नोंद न घेता दिलेला न्याय त्यांना अमान्य आहे. यासाठी ते सर्वांना पत्र वाचण्यास सांगतात. पून्हा केस सुरु

करण्याविषयी दिवाकरने पत्र पाठवावे किंवा लवकरात लवकर येऊन भेटावे अशी अपेक्षा करतात. येथे त्यांना न्यायाची भूक लागलेली आहे.

११.३ या पत्रात गणेश चौधरींच्या स्वभावाचा वेगळा पैलू दिसून येतो. आपले अवगुण झाकून न ठेवता. वेड न लपवता आपण वेडे होते हे सांगत आहेत आणि हा वेडेपणा लक्षात न घेता न्याय दिल्यामुळे तर त्यांना या प्रशासनाचा खुप राग आला आहे. त्यासाठी ते केस पुन्हा सुरु करुन त्यांचे वेड त्यांना सिद्ध करावयाचे आहे. येथे त्यांचा स्वभावाचा असलेला प्रामाणिक गुण दिसून येतो. तसेच वेड हे रिकामेपणामुळे लागलेले आहे. आपण आपल्या प्रिय व्यक्तींची हत्या केली. ती जाणीवेत नसताना केली आहे. त्यांचा भार कमी करण्यासाठी ते केस सुरु करत आहेत. त्यामध्ये कोणताही हेतू नाही असे स्पष्ट सांगतात.

११.४ येथे सुरवातीस त्यांची मानसिक अवस्था ठिक नाही अत्यंत अस्वस्थेत ते हे पत्र लेखन करतात. त्यांचे नंतरच्या काळात मानसिक स्वास्थ बिघडण्याचे कारण म्हणजे त्यांना दिलेला कोर्टाने न्याय त्यासाठी त्यांना केस पुन्हा सुरु करायची आहे. त्यासाठी सर्व कागदपत्र जमा करतात त्यावेळी त्यांना होणाऱ्या त्रासाबद्दल ते सांगतात की, ''दिवसभर घरात बसून राहत होतो ते कशासाठी? खालच्या व वरचा मजल्यावर पुढच्या खोल्यात 'लोक काहीही म्हणतात' म्हणून मागच्या खोलीत भीती....राग......विचित्र वेडामुळे हैराण झालो म्हणून. डोक्यात विलक्षण विचारांची उधाण भरती......'मोठी आई, मी तुझ्याकडे वाईट नजरेनं पाहिलं नाही.' 'कोण म्हणतं?' 'लोक म्हणतात!' 'वहिनी मी दादांना लात मारली नाही''कोण म्हणत?' 'लोक म्हणतात!' 'भाऊले लाथ मारतो तू?' सारचं विचीत्र। माझे पाय खूप लांबायचे... आपोआप! पन्नास साठ फुट विलक्षण....काहीच समजेना......क्षणीक भावनांचा विचित्र पगडा...आणि नग्न मन शापित मन.''[१४] येथे चौधरींच्या मानसिकतेचा प्रत्यक येतो.

**१२.१ हे पत्र गणेश चौधरी यांनी ती दादांना दि. ३१ मार्च १९७० रोजी लिहिले.**

१२.२ या पत्रामध्ये लिहितात की, त्यांनी पाठवलेल्या मंगलपत्रिका व चिठ्ठी पोचलेली आहे. ते पाहून त्यांना सोडून गेलेल्या प्रिय व्यक्तिंची त्यांना आठवण होत आहे. अशा घृणास्पद दिलेल्या वागणुकीत ही ते जगत आहेत. पण दादांनी त्यांच्यावर दाखवलेल्या मायेमुळे ते सुखावले आहेत. ते दादांना सांगतात माझ्या मनातील विचार सर्वांना कळत दुरवर पसरत

होते. तरीही डॉक्टरांनी त्यांच्या लक्ष दिले नाही. त्यामुळे त्यांना येणाऱ्या संतापाविषयी लिहितात. आपल्यामनात स्त्रियांच्या विषयी अश्लिल विचार येतात. ते ही डॉक्टरांना समजतात या सत्यामुळे त्यांची मानसिकता बिघडत होती. तरी डॉक्टरांना वारंवार सांगत 'लोक माझ्याविषयी काहीही बोलतात पण त्यांना मानसतज्ज्ञाकडे उपचारासाठी पाठवले जात नाही. याचे दु:ख होते ते पुढे लिहितात जर त्यांना योग्य उपचार मिळाला असता तर त्यांच्या मनाला आवरण मिळाले असते तर त्यांच्यावर पश्चाताप करण्याची वेळ आली नसती. यावरती त्यांची पत्नी त्यांना समजवत असे सर्व तुमच्या मनाचे खेळ आहेत. भ्रम आहे. पण ते ऐकत नसत. ते एका मनोरुग्ण मित्राचे उदाहरण देतात. त्याला त्यांच्या सारखा त्रास होत होता. पण नागपुरच्या डॉक्टरांनी त्याला त्या शापातून मुक्त केले होते. ते सांगतात फक्त कल्पनाकरुन पाहा की आपल्या मनातील चांगले वाईट विचार दुसऱ्याला समजतात त्यावेळी आपली होणारी मानसिकते विषयी लिहिताता.

१२.३ या पत्रातून गणेश चौधरींना वाटते आपल्याला कोणी तरी लक्षात ठेऊन आठवण काढत आहे. आपली काळजी करणारे कोणी तर आहे. ही घटना त्यांच्या मनाला सुखावते. आपल्याला आतापर्यंत फक्त घृणास्पद वागणूकीत कोणीतरी चांगले वागवते आहे. यामध्ये ते आनंदी आहेत. त्याचबरोबर आपल्याकडून जे कृत्य घडले त्यापेक्षा दुसरे कोणते जरी घडले असते तर आपण इतके खचलो नसतो. पण या घटणेने सर्वस्व हरवले आहे. यांचे अत्यंतिक दु:ख त्यांना होते. येथे त्यांना त्यानी केलेल्या कृत्याबद्दलची जाणीव आहे पण त्याचबरोबर ते डॉक्टरांना ही दोष देत आहेत. ते लिहितात त्यांच्या मनातील विचार आधी लोकांना समजले नंतर त्यांना कळाले की आपले विचार दुसऱ्यांना समजत आहेत, त्यामुळे त्यांच्या मनाची होणारी घुसमट ते लिहितात. मग डॉक्टरांना, नातेवाईकांना ते सांगतात की, माझ्या मनातील विचार दुसऱ्यांना समजत आहेत. लोक काहीही बोलतात पण त्यांच्यावर कोणीही विश्वास न ठेवता त्यांना योग्य उपचाराची गरज असताना त्यांच्यावर सर्वांनी अन्यायच केला होता. पण येथे ते नागपुरच्या डॉक्टरांचे आभारही मानत आहेत. त्यांच्या उपचारामुळे त्यांना हे जीवनदान मिळाले होते. हे सर्व सर्वांच्या स्नेहामुळे झाले होते. यांची कबुलीही ते देतात. येथे त्यांच्या मनाची घुसमट ते व्यक्त करताना दिसतात.

१२.४ चौधरी पत्राची सुरुवात करतात ते मंगलपत्रिका व प्रियजनांच्या आठवणींने पण लिहित लिहित ते डॉक्टरांचा बेजबाबदारपणा तसेच 'लोक' यांचे गाराण सांगत आहेत. येथे लोकांच्या बोलण्याचा त्यांनी विचार केला त्यातून त्यांची मानसिक स्थिती अधिकच ढासळत गेलेली दिसून येते. याविषयी ते सांगतात की, ".....लोक माझ्या मनातील विचार ओळखत व त्याला अनुसरुन .....दुरुन....काहीही म्हणत......मी संभ्रमात पडे......मलाच का म्हटलं का......का म्हटलं......संतापून जाई.......तर केव्हा हतबल ........निष्प्रभ होई समजेना ते विचार डोक्यात फिरत पुन्हा कोणी शहाणा त्याची पुनरावृत्ती करी.....! विचारणं सभ्यतेला धरुन नसे...... मी सभ्यता करुनच मेलो."[१५] येथे चौधरी त्याच्या मनोविकृत्तीचे एक-एक पदर वाचकांना सांगत आहेत. त्यांनी केलेला विचार अविरतपणे, अथकपणे व अनियंत्रित त्यांच्या भोवती फिरता हाते. कधी वाचलेले, ऐकलेले शब्द विचित्र विचार त्यांच्या भवती फेर धरत असलेले दिसून येतात. येथे आपल्या मानसिक आजाराविषयी विचाकाला सांगताना दिसून येतात.

**१३.१ हे पत्र चौधरींनी ती दादांना लिहिलेले आहे.**

१३.२ या पत्रातून त्यांनी जे दु:ख सर्वांना दिले त्यामध्ये त्यांचा दु:ख देण्याचा हेतू नव्हता. तसेच तुमच्या विषयीचा पूर्वीसारखा श्रद्धा निर्माण झाल्याशिवाय तुमच्याशी भेटीत काय बोलावे समजत नव्हते. त्यामुळे फक्त रडणे, दु:ख व व्यथा ऐवढेच ते सांगत होते. पण आता आपण ही काहीतरी सांगून मरावे असे त्यांना वाटू लागले आहे. तसेच त्यांना न्यायालयाने दिलेल्या न्यायावर त्यांनी किवकरावीशी वाटते. पण यामध्ये ही दु:ख सहन करुन हसण्यास शिकले आहेत. आता जीवनात येणाऱ्या संकटांना आव्हाण देऊन जगण्याचा निश्चय त्यांनी केला आहेत. आता लोकांनी चांगले म्हणावे अशी अपेक्षा ते धरत नाही. कोणती भिती न बाळगता जगण्याचे ठरवतात. त्यांनी सर्व नीतीतत्वे व सामाजिक संकेत न लावता जगायचे आहे हे संकेत लावल्यामुळे ही शोकांतिका निर्माण झाली होती. तसेच माणूस स्वत:च्या भाव-भावनांला तो वळण देऊ शकत नाही. कारण त्यांना साधू होता आले नाही. तसेच त्यांना दिलेले जीवन हेच मुळी त्यांना मिळालेली शिक्षा होती असे लिहितात.

ज्यांनी जगावे ते निघून गेले आणि जगाच्या पाठीवर पुत्रहत्येसारखं पाशवी कृत्य त्यांच्याकडून घडले होते. या ही पुढे हे शापीत मन जाऊन सामाजिक बंदने तुडवत आहेत. त्यांची ही दोलायमान अवस्था समोरच्यावर नाहक हाल्ला करत असते. त्यामध्ये त्यांचा कधी कधी क्रोध उफाळून येतो. त्याला स्वत:ला जबाबदार धरतात. पण या माझ्याकडून घडलेल्या कृत्यानंतर तुमी माझ्याबरोबर धैर्याने चालू शकाल का? असा प्रश्न ही विचारतात जवळची माणसं फिरु शकतील पण हे धैर्य सर्व दाखवणार नाहीत पुढे लिहितात माणसाचे जीवन हे दुबोध काव्य आहे. तसेच येथे लिहित असताना नव्या प्रतिमा लेखक वापरत नाही जसे आहे तसेच लिहिण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच पाहिलेतर चौधरी म्हणतात. प्रत्येक शब्दाला प्रतिमा चिटकलेली असते. तसेच ज्ञात मनाप्रमाणे अज्ञान मन असते. तसेच सुप्त मन ही असते. त्यामध्ये शेकडो सुख-दु:खाचा साठा होतो. आणि त्यांचा स्फोट वेडात होताना दिसतो. यानंतर लेखक म्हणतो मी स्वत:ला त्रयस्तासारखा बघत होतो. त्याचा पाठलाग करत होतो. कारण सुप्त मन हे विचार त्यांचे शेकडो धागे विनत असतात. तसेच नेनिवेमन दोऱ्याच्या रिळासारखं ते स्मृती गुंडाळून जात असत जसे चौधरी गुंडाळले आहेत. उदाहरण देतात ते पी. एस. आय. झाल्यालेल्या एका मित्राचं आपण लहापणी लंपास करत असलेल्या वस्तू व त्यांची स्मृती सांगतात. तसेच स्मृतीच्या तंद्रीतून बाहेर आल्यावर स्मृती थांबते. पण सुप्त मनातील विचार थांबणे शक्य नसते. पण जेव्हा जाणीवेत येते तेव्हा आपल्याला या विचारच्या आवर्तनाने अवाक् होतो तसेच हे सर्व आता समजून उपयोग काय कारण हे सर्व कडू सत्य त्यांना डॉक्टरांनी सांगायला हवे होते. पण त्यांनी न सांगितल्यामुळे ही वाताहात झाली होती. येथे ते डॉक्टरांच्याकडे जातात तेव्हा एक खुळ असते. येतेवेळी दुसरेच घेऊन येत असल्याचे दिसते. त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन भितीच्या भोवऱ्यात जगलो होतो. येथे गणेश चौधरी त्यांच्या शोकांतिका लिहितात.

१३.३ येथे चौधरींना आपल्या वागण्यामुळे दुसऱ्यांना झालेल्या दु:खाची जाणीव आहे. पण आता हे सर्वांनी विसरुन पुढे चालावे अशी अपेक्षा ते करत आहेत. ते सांगतात मला सर्वांच्या विषयी पूर्वी इतक्या श्रद्धा निर्माण करायच्या आहेत. त्यांना दु:ख झाले आहे. त्याला वाचा फोडण्यासाठी ते पत्रलेखन करत आहेत. तसेच त्यांना कोर्टात दिलेला निर्णय त्यावर कोर्टाचीच दया येत आहे. पण या सर्वातून सावरुन त्यांनी जीवनाला हसत सामोरे

जाण्याचा निश्चय करतात. आतापर्यंत लोकांनी चांगले म्हणावे म्हणून जगत होतो पण आता 'लोकांच्यासाठी' बदल करायचा नाही. आता बिनधास्त जगण्याचे ठरवितात. तसेच नितितत्वे व सामाजिक बंधने लादून जी शोकांतिका घडली ती नंतर त्यांना लादून द्यायची नाहीत. तसेच स्वत:च्या भावनांशी प्रतारणा न करता त्यांना जगायचे आहे. हे सर्व लिहित असताना त्यांच्या लेखणीत सत्यता जाणवते. येथे चौधरींनी जगण्याचा हव्यास नाही. त्यांच्या पापाचा त्यांना पश्चाताप आहे. पण आता ते जगताना मोकळेपणाने जगण्याची त्यांची इच्छा आहे. सुप्त मनाला ते त्यांच्या जीवनात थारा देत नाही. त्यांना स्मृती जागृत करायच्या आहेत. पण त्या जाणीवेतील आणि त्यांच्या आठवणी त्यांची जगण्याची इच्छा आहे.

१३.४ पत्राला सुरुवात केली त्यावेळी त्यांनी स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न केला आहे. जीवन हसत जगण्याचा ते निश्चय करतात. पण मध्येच त्यांची मानसिकता ढासळलेल दिसते ते लिहितात, ''आता उरला लढा! कशाचा? कोणाचा? कोणाशी? काहीच लिहीत नाही. काही महिन्यांपासून 'पेपर' वाचावयाला हाती धरला, गुळाचा खडा तोंडात टाकला कोण द्वंद माजलं केवढ युद्ध! मनस्ताप! तुम्ही हे कुणाला सांगितलं तर तो खदखदून हसेल, वेड्यात काढेल, हजारो गनीमांवर बेधडक एकट्यानं चाल करुन जाता येतं पण स्वत:शी युद्ध! माझा एकमेव शत्रु बाहेर असल्याचा भास होतो. तो 'आत' निघला. कसं काय सोडून जीवन जगावं, माणूस कितीही दु:खात असला तरी 'जाग' आल्यावर नवी नवी अतृप्त अशी इच्छा...... तुफान वादळ निर्माण करतात मनाच्या सागरात.''[१६]

त्याचप्रमाणे चौधरी अनेक उपमा वापरतात स्मृतींना ते धागे म्हणतात तसेच प्रतिमा. किंवा विद्यार्थी दशेत ओढलेली सिगारेट तसेच मांजाचे उदाहरण देतात. आपल्या मनाच्या मानसिकतेला ते व्यक्त करत असताना पहिल्यांदा वेश्येकडे जाणाऱ्याचे उदाहरण देतात. या सर्व उदाहरणांवरुन त्यांच्या मानसिकतेची आपल्याला कल्पना येते. येथे त्यांनी आपल्या 'नग्न मनाची' व्यथा, वेदना व शोकांतिका वाचकांना सांगताना दिसून येतात.

**१४.१ गणेश 'दा' ने हे पत्र चि. सौ. कल्पानास दि. ३१/०१/१९७१ रोजी लिहिले आहे.**

१४.२ अत्यंत निर्विकारपणे पत्रलेखन केले आहे हे पत्र कल्पनाने पाठवलेल्या पत्रास उत्तर म्हणून पाठवत नाही तर तिच्या आरोपावरुन लिहिले आहे. आता त्यांनी मन रमविण्यासाठी नवीन कार्यक्रम चालू केल्याचे सांगतात. तसेच त्यांना नाट्यदिग्दर्शनाबद्दल थर्मास बक्षिस मिळाल्याचे सांगतात. ते हे पत्र फक्त खुशाल कळवणारे वार्तापत्र म्हणून लिहितात. तसेच त्यांच्यात बदल झाल्याचे लिहितात. आता त्यांना त्यांच्या विषयी ही आपुलकी राहिलेली नाही. त्यांच्यात ही विध्वंसक प्रवृत्ती निर्माण झाल्याचे सांगतात. त्यांना जगण्याची व देवाचीही पर्वा वाटत नाही. हे एकून सर्वांना दुःख होईल अशी त्यांची भावना आहे. पण आता या पुढे कोणालाही पत्र लेखन करायचे नाही असा ते निश्चय करतात. आणि मृत्यु आल्यानंतर तुमाला हॉस्पिटलमार्फत कळवले जाईल असे सांगतात. तसेच आता गणेश मेला आहे त्यांचे प्रेत फक्त आहे शेवटी लिहितात आता 'मी' माझा राहिलो नाहीतर तुमच्याशी नाते कसे राहिल असे कठोर पत्र लेखन करतात.

१४.३ या पत्रामध्ये चौधरींचे वेगळे रुप वाचकांच्या समोर येते. त्यांनी सर्वांशी नाती तोडून अत्यंत कठोरपणे आपल्या मृत्यु विषयी सांगतात. तसेच त्यांचा देवा विषयीचा राग व्यक्त होतो. त्यांनी स्वतःला बदलले आहे. त्यामुळे कोणत्याही नात्यात अडकण्याची त्यांची इच्छा नाही. त्यामुळे त्यांनी पत्रलेखनास स्पष्ट नकार देताना दिसतात. आणि हे शेवटचे पत्र असल्याचे लिहितात. येथे चौधरी सर्व मोहपाश सोडून देऊन अत्यंत त्रयस्तपणे लेखन करताना दिसतात.

१४.४ या पत्रावरुन चौधरींच्या मनात असलेली एकाकीपणाची जाणीव दिसून येते. हे पत्र लिहित असताना त्यांनी एकाकीपणाची मानसिकता निर्माण झाली आणि त्यामुळे हे पत्र शेवटचे म्हणून लिहितात. आता ते कोणतेही नाते मान्यकरत नाहीत. जेथे नाती ही तोडली म्हणून लिहिणे जेवढे सोपे असते तेवढे तोडणे अवगड असते त्यामुळे सवयीने असो पण शेवटी तुझा 'दादा'ते लिहितात. म्हणजे येथे त्यांची मानसिकतेत दोलायमान अवस्था दिसते.

**१५.१ हे पत्र चौधरींनी चि. सौ. कल्पनास ११/०५/१९७१ ते २८/०५/१९७१ या दोन टप्प्यात लिहिलेले आहे.**

१५.२ कल्पनाचे पत्र आल्यावर स्मृतीचा जो लोट येतो आणि वैशालीच्या जन्मामुळे गीताजंलीची आठवण दाटून येते. या संदर्भात लिहितात ती जर स्वतःहून गेली असती तर

त्यांना दु:ख झाले नसते. पण त्यांच्याकडून झालेल्या भ्रुण हत्येमध्ये तिचा हुंकार बाहेर येण्याआगोदर तिचा नि:श्वास कानी आल्याचे दु:ख झाले आहे. या दु:खानंतर पत्र येथे थांबवतात. नंतर दि. ११ पासून सुरुवात करतात. त्यामध्ये पत्रलेखनास झालेल्या दिरंगाई बद्दल सांगतात. तसेच बेबीचं नांव 'निवेदिता' ठेवावे अशी इच्छा व्यक्त करतात. त्याचप्रमाणे विवेकचं नाव ठेवण्याच्या वेळी त्यांची मनस्थिती ठिक नव्हती. त्यावेळीची परिस्थिती सांगतात. तसेच पुढे लिहितात त्यांना मरणाची भिती वाटत नाही व आपल्या मरणावर अश्रुही ढाळू नये असे सांगतात. पण त्यांना या वेदना असह्य झाल्या आहेत. त्यांना गुदमरुन जायची वेळ आली आहे असे लिहितात. अशा परिस्थितीत दिवाकरने दिलेला जगद्गुरुंच्या पुस्तकामुळे ते आस्तिक झाले होते. परमेश्वराविषयी श्रद्धा त्यांच्यात निर्माण झाली होती. आणि मृतात्म्यांच्या शांतीसाठी प्रार्थना ही त्यांनी केली होती.

१५.३ प्रियजनांच्या आठवणीने व्याकुळ झालेले गणेश चौधरी दिसतात. त्यामध्ये असलेले पितृप्रेम दिसून येते. येथे मुलीच्या आठवणीने त्यांचे अंतकरण भरुन आलेले दिसते. त्या आठवणीने ते व्याकुळ होतात. तसेच पत्रलेखनास दिरंगाई झाली त्यामागे जे कळत होत, ते लिहून उपयोग नव्हत, जे लिहावं ते सुचत नाही, या द्वंदामध्ये ते अडकलेले दिसतात. तसेच चि. विवेकचे नांव ठेवत असताना त्यांची मानसिकता ठिक नव्हती तसेच त्यांना प्रियजनांच्या आठवणीने व्याकुळ होणाऱ्या मनाचे दर्शन दर्शन येत होते.येथे त्यांनी आपले मन त्यांची होणारी घालमेल स्पष्ट सांगताना दिसतात आणि आता ते आस्तिक झाले आहेत. आणि देवावर विश्वास आहे. यांची स्पष्ट कबुलीही ते देत आहेत येथे त्यांचा स्पष्ट स्वभावगुण दिसून येतो.

१५.४ या पत्रामध्ये चौधरींची मानसिकता ढासळलेली आहे. जुन्या आठवणींमुळ— त्यांच्या मनाचा तोल ढळलेला दिसतो. येथे वैशालीच्या जन्मामुळे त्यांना गीतांजलीची आठवण होते आणि पुन्हा त्यांच्या भुतकाळातील घटणांना उजाळा मिळतो. ते पुढे लिहितात. विवेकचे नांव त्यांनी ठेवावे अशी सर्वांची अपेक्षा होती पण त्यावेळी त्यांच्या मानसिकते विषयी लिहितात, "एकीकडे गरगरणारं वेड, भोवळं आणणारं स्मरण-विस्मरणाचं द्वंद....अजाणता घडलेल्या हत्येचा पश्चाताप त्यांचा उसणारा वियोग, जीवनाविषयीची आत्यंतिक घृणा, स्वत:विषयीचा धारदार द्वेष, मृत्युची उत्कंठनं वाट

पहाणारं मन, रक्ताचे अश्रु ठिपकणारे डोळे, रक्तानं माखलेले तिरस्कृत हात, स्पंदनाची वाढणारी बेचव, कडवट चव, आणि सेंट्रल जेलमधील तो फाशीगार्ड ती रुक्ष, भयाण, भकास, उदास, अंधारलेली खोली, आणि जाणीव-नेणीवेच्या आंदोलनात मला चक्रावून टाकणांर वादळी, सैतानी वेड!.....''[१७] येथे त्यांच्या होणाऱ्या मनोविकृतीचा त्रास ते वाचकांना सांगत आहेत. त्यांना मरणाचे काही वाटत नाही. तसेच ते देवावर विश्वास ठेऊ लागले होते. येथे त्यांच्य मानसिकतेत झालेला बदल दिसून येतो.

**१६.१ हे पत्र गणेश 'दा'ने दिवाकरला दि. ३०/१२/१९७५ रोजी लिहिलेले होते.**

१६.२ दिवाकर व निळू भेटून गेल्यामुळे त्यांना बरे वाटले त्यानंतर पत्र लिहिले आहे. तसेच दिवाकरची चांगली झालेली तब्बेत बघून त्यांना आनंद झाला आहे. त्यांनी पाठवलेल्या वस्तू त्यांना आवडल्या आहेत पण टोपनाचा पेन दिल्यामुळे क्षणभंगूर विचार टोपण काढेपर्यंत नष्ट होतात. तसेच त्यांच्या मनात येणारा 'अनोळखी अधिकारी' व त्यांचे विचार त्यामुळे दुरुन वेगवेगळे आवाज येतात. त्यामुळे वाटणारी भीत आणि 'नग्न मन' यांचे वर्णन करतात. तसेच यावलला असताना त्यांच्या घेतलेल्या सह्या त्या कागदाची प्रत त्यांना हवी आहे ते म्हणतात ते कितीही कटू सत्य असले तरी त्यांना ते पहावयाचे आहे. त्यामुळे कदाचित त्यांना न्याय मिळण्याची आशा आहे. त्यासाठी ते विनंती करतात. ते कागदपत्र पाठवून द्यावेत जर ते पाठवून दिले नाहीत तर त्यांचा उलट परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे यावलला असताना हवालदाराचे बोलणे व त्यांचे विचार ही ते लिहितात. त्याचप्रमाणे ते म्हणतात जर केसच्या वेळी सिडी तयार केली असती तर माझे वेड मी त्यांना सांगू शकलो असतो. तसेच सिव्हील हॉस्पिटलमध्ये ते होते. त्यावेळीचे त्यांना काहीही समजत नव्हते. संपूर्ण काळोख निर्माण झाला होता. तसेच कोर्ट 'मानसतज्ज्ञ' असल्यासारखे न्याय कसा ते देऊ शकतात. यावरती त्यांना कोर्टाची कीव वाटते. त्यावेळी जर त्यांचे बोलणे टाईप केले असते तर त्यांनी 'कोण लोक' बोलतात हे समजावून सांगितले असते. त्यांना जाणीव आली पण त्यावेळी त्यांचा उपयोग झाला नाही. आता त्यांना या शापीत मनाबरोबर जगणे क्रमप्राप्त होते. सर्व नामशेष झाल्यावर संसाराची धुळ झाल्यावर त्यांना त्याचे वेड उमजले होते. त्यांना सर्वांसारखे मन नाही मिळाले याची खंत मनात आहे. या शापीत मनातील विचारांना दगडाचा वापर करुन त्यांनी मारले आहे

नाहीतर ते म्हणतात असे वागणे शक्य नाही. सर्व सांगतात त्यांचा विचार करु नको. पण व्यक्ती पुढे आल्यावर त्याबद्दल मनात येणारे विचार आणि विचित्र हलचाल त्यामूळे वाढणारे वेड, यांचे चक्र सुरु होई तसेच त्यांचे काहीच खाजगी नव्हते त्यामुळे त्यांचे वेड वाढत होते. ते लिहितात सर्वांच्या मनात एक गुप्त कप्पा असतो जो स्वत:त्या व्यक्तिला समजलेला नसतो. तोच सर्वांना समजत होता. त्यामुळे लहाणपणापासून त्यांचा हा कप्प्यामुळे त्यांचे वेड वाढतच गेले. त्यांच्या मानसिकविकृतीबद्दल ही लिहितात.

त्याचे आणि तुषारचे संबंध पिता पुत्रापेक्षा एक कविन्हदयाचा पिता म्हणून जास्त जवळीक होती. त्यांना त्यांच्या मुलाचे संगोपन हे मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून करावयाचे होते. त्यामुळे त्यांनी कधी मुलाला भिती दाखवली नाही. दिवाकर त्यांना तुषारला शाळेत बाहेर पाठविण्यासंदर्भात बोले पण त्यांचे मन त्या गोष्टीला राजी नव्हते. मुलाला लहाणपणी मरणाविषयी कसे सांगावे. त्याचा परिणाम काय होईल असा विचार ते करताना दिसतात. तसेच राजू झाल्यावर तुषारवर परिणाम होऊ नये म्हणून त्याची काळजी घेत पण या आपल्या अशा वागण्यावर लोक काहीही बोलतात असे वाटे. पण त्यांना त्यांचे पित्याचे हृदय दिसत नव्हते. पण असा पुत्र पाखरासारखा कधी पिंजऱ्यातून उडून गेला. याचे भान शापीत मनाने त्यांना लागू दिले नाही. या सैतानी, पाशवी पाश सतत त्यांना सतावत रहिलेला आहे. या शापीत माणसाबरोबर तू दिवाकर फिरु शकशील पण लोकांचे बोले त्यामुळे त्यांचे मन मात्र घायाळ होणार होते. आता शॉकमुळे व सायकोॲनालिसीसमुळे ते बरे होतील तसेच आईसाठी ते रजेवर येतील. तीला बरे वाटावे म्हणून तिला दु:ख होऊ नये म्हणून जे जपत होते. हे पत्र अत्यंत उस्फुर्तपणे लिहिले आहे.

१६.३ आपल्या माणसाच्या आपुलकीच्या प्रेमाने ते न्हाऊन गेले आहेत. आता त्यांना समाधान वाटत आहे. तसेच दिवाकरची चांगली प्रकृती बघून, त्याने दिलेले साहित्य या छोट्या गोष्टीचा त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच स्वत: मधील 'अनोळखी अधिकारी' यांची जाणीव त्यांना झालेली आहे. त्यांना आठवण होते यवालला केलेल्या सह्याच्या कागदांची ते कितीही कटू सत्य असले तरी ऐकण्याची त्यांच्या मनाची तयारी आहे. त्यांनी जीवनविना तक्रार जगण्याचा निश्चय करतात. येथे त्यांच्या जीवनाला आलेली स्थिरता दिसते. येथे ते आपल्या भूतकाळातील आठवणीतून लिहितात त्यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये

उपचारांच्यावेळी दिसणाऱ्या अनेक प्रतिमा सांगतात. आपले वेड त्यांना समजून सांगायचे आहे. त्यासाठी त्यांच्या मनाची चाललेली धावपळ लिहितात. पण येथे सर्व करत असताना त्यांचा परिणाम मनावर होऊ द्यायचा नाही हा निश्चय ही ते करतात. येथे त्यांच्या संसाराचे स्मशान झाले आहे. या पाठीमागे असणाऱ्या 'शापीत मन' त्यांना आज समजते.पण त्यांचा उपयोग नाही हे त्यांना उमगले आहे. चौधरींना स्वत:च असे आयुष्य जगायच होत पण दुर्दैवाने ते सार्वजनीक केल्यामुळे त्यांना वेड लागले. म्हणून दैवावर त्याचा राग आहे. ते व्यक्त करतात तसेच आपल्या मुलांना वाढवत असताना मानसशास्त्रीय दृष्टीने वाढवायचे ठरवितात. जे त्यांनी सहन केले ते तुषारला सहन करावे लागू नये यासाठी त्याला भिंती दाखवित नाहीत. तसेच त्याला आपल्यापासून दुर ठेवण्याचा विचार त्यांना पसंत नाही. येथे त्यांचे हळवे मन दिसते. या हळव्यामनावर त्यांच्या लहानपणी कसे आघात झाले होते ते लिहितात. येथे गणेश चौधरी हे पत्र दिवाकरला लिहित असताना त्यांच्या जाणीवेतील प्रसंगाना उजाळा देत असताना जे भोगावे लागले त्यापाठीमागे त्यांचे 'मन' होते. लहानपणापासून त्यांचे 'नग्न मन' असल्यामुळे झालेले आघात येथे ते लिहितात.

१६.४ दिवाकर चौधरी व निळू भेटून गेल्यावर भूतकाळातील अनेक आठवणी त्यांच्या मनात फेर धरतात. त्यावेळी पत्र लिहितातना त्यांची मनोविकृती उफाळून येते उदाहरण म्हणजे "वेडात सुरवातीला 'हा' माझ्या मनातल ओळखतो असा क्षणजीवी चुटपुटता विचार वेगानं गरगरुन गेला दोनचार वेळा पण लगेच 'विस्मरण' झालं. आश्चर्य, भयानक भीती, अगतिकता, अशक्यता, भास, भ्रम, चक्कर, असंबध्दता, जागरण, ओरडणं वा रडणं, 'लोक म्हणतात' का? का? का? का? का? असा मी डोक फुटेल इतका विचार केला. घरात बोललोही, वेड्यासारख वागला.... ते जाऊ दे... मुद्दा ऐवढाच की वेडात 'लोक म्हणतात' अगदी सर्व सर्व 'कुणीही', 'काहीही' म्हणत."[१८] येथे चौधरी लेखन करत असताना त्यांची मानसिकता कुठेतरी घसरलेली दिसते. तसेच त्यांनी आपल्या मुलाबरोबर वागत असताना त्याला मरण म्हणजे काय हे जाणून घ्यायचे असताना त्यावेळी हळवे घेऊन रडणे आणि मी असाच मरणार आसे बोलल्यावर त्यांना होणारा त्रास ही घटना आठवल्या नंतर त्याला त्याच्या मरणाचे गूपीत कसे समजले यावर चालले विचार, त्यातून होणारा त्रास व

मानसिकता दिसून येते. या संपूर्ण पत्रामध्ये चौधरी यांची मानसिकता संपूर्ण ठिक असल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या मानसिकतेचे पडसाद या पत्रात दिसतात.

१६.५ डॉ. रवींद्र पाटील हे गणेश चौधरी : पत्रलेखनातून जाणवणारे व्यक्तीत्व या लेखात लिहितात, ''स्व'शी निगडीत नेणिवेतील विकृत विचारांच्या जाणीवेतील स्पर्श बिंदूमुळे स्वनिखंदन तीव्र होते. स्वत:च्या विकृतीच्या कारणभावांसह मेंदूचे अकारण विघटन करण्याची सवय येथे दृगोच्चर होते.''[१९]

**१७.१ गणेश चौधरी हे पत्र ती. सौ. आईस दि. ३/४/१९७२ रोजी पाठविले आहे.**

१७.२ या पत्रामध्ये दादाना पाठवलेल्या पत्रामुळे तुमाला त्रास झाला. पण तस करण्यापाठीमागे त्याचे तात्विक भांडण आहे. ते फक्त त्यांच्यात आणि सरकारमध्ये कायम चालत रहाणार असल्याचे लिहितात. आता मी आनंदात असल्याचे सांगतात आणि यापुढे सुखात राहण्याचे ठरवितात. तसेच त्याच्या जवळ राहून त्यांची सेवा निस्वार्थ करण्याची इच्छा आहे. पण असे कर्म जेव्हा घडेल तेव्हा मी सुखी राहिन असे लिहितात. पण आईने दिलेला प्रसाद न घेतल्यामुळे त्यांना दु:ख होते. ते नास्तिक आहेत पण आईने प्रसाद दिला आहे म्हटल्यावर तो त्यांनी घ्यायला हवा होता असे त्यांना वाटते. त्याचप्रमाणे सर्वांनी सुखी रहावे, कल्पनावर जबाबदारी घेतल्यामुळे त्यांना तिचा अभिमान वाटतो. तसेच आई-वडिलांनी नातवांडे खेळवत दिवस घालवावेत असे लिहितात. तसेच पॅरोलच्या सुट्टीचा अर्ज करण्यास सांगतात व कल्पनाचे पत्र आल्यावर त्यांचप्रमाणे कल्पनाच्या पत्राला उत्तर देतात. व कल्पनाला सविस्तर लिहिण्यास सांगतात. तसेच दि. १९/३/१९७२ ला श्रुतीकामध्ये 'सीमांन्त' लागली होते. ती ऐकण्यास सांगतात. या पत्रामध्ये त्यांच्या अंतकरणातील वासल्याचा झरा आपल्याला दिसतो.

३) आपल्यामुळे सर्वांना त्रास होते याची जाणीव त्यांना आहे. पण येथे त्यांची भांडणाची प्रवृत्ती असल्याचे सांगतात. ते स्पष्ट कबुली देतात. पण सर्वांच्या सुखाची अपेक्षा/इच्छा ही मनात धरताना दिसतात. तसेच ते मातृभक्त असल्याचे ही दिसतात. त्यांना आईची सेवा करण्याची मनोमन इच्छा असते. तसेच आईची सेवा करण्यास जेव्हा मिळेल तो त्यांच्या जीवनातील सर्वात सुखाचा क्षण असेल तसेच कल्पनाने घरची जबाबदारी घेतल्यामूळे त्यांना तिचा अभिमान वाटतो. येथे त्यांच्या ठिकाणी आपण कोणतेच कर्तव्यपार पाडू

शकलो नाही याची खंत ही व्यक्त होते आणि त्यांचे आपल्या कुटुंबावर असलेले प्रेम व्यक्त होते. आणि आता आपल्यामुळे सर्व दु:खी होतात म्हणून त्यांना आपण असल्याचे सांगतात. येथे चौधरीयांनी आपल्या सुखापेक्षा घरातील व्यक्तींच्या सुखाचा विचार केला.

**१८.१ साहित्यिकांना लिहिलेल्या पत्रालेखनात पहिले पत्र चौधरींना प्रिय चि. सौ. लिलास दि. ३/९/१९७३ रोजी पाठविले आहे.**

१८.२ या पत्रात ते लिहितात, गणेशोत्सवाची धामधुम सुरु होती. मैफील्या रंगल्या होत्या. त्यावेळी त्यांचे पत्र त्यांना मिळाले. संध्याकाळी वाचू असे म्हणून ते पत्र ठेवतात पण राहवले नाही. त्यांनी पत्र वाचले आणि त्यांचे डोळे पाणावले होते. ते पत्र वाचल्यावर आठवणी मनात दाटून येतात. आणि सुरु होते विचाराचे चक्र आणि या मनाच्या रंगमंचकावर प्रत्येक व्यक्ति साद घालते. पण ते मात्र निद्रादेवतेला विनंती करत असताना ज्या रात्री त्यांनी अभिसारिका वाढत होत्या त्या नकोश्या वाटत आहेत. पण येथे मनाच्या रंगमंचकावर अनेक व्यक्ती येतात जातात. ज्यावेळी हे पत्र मिळाले त्यावेळी तुझी आठवण झाली. येथे तिला म्हणतात सुखात असल्यावर कोणी विचारत नाही, दु:खी व्यक्तीच एक दु:खी व्यक्तीला समजू शकातो. त्यासाठी ते त्या दु:खाचे ऋण मानत आहेत. येथे ते तत्वज्ञान सांगतात पण त्यांना ते अनुभवाने आलेले प्रत्येकाचे आपले एक तत्वज्ञान आहे. पुढे ते लिहितात प्रत्येकानं कुणाना कुणावर प्रेम करावे. प्रत्येकाचे आपले एक श्रद्धास्थान असावे असे सांगतात तिला पतीने भेटून दिले नाही. त्यांवेळी त्यांनी गुरु शिष्याच्या नात्यातील प्रेमाचे महत्त्व त्यांना समजले असे वाटते नाही तसेच तू लिहितेस पण नंतर फाडून टाकतेस असे त्यांना समजते. त्यावेळी जे तू लिखान करशील त्यांत कृत्रिमता न आणता लिहावे ते पाठवत जा, पण तुला आनंद वाटत असेल तर पाठवत जा म्हणून सांगतात. तसेच पतीची सेवा मनोभावे कर त्यामध्ये तुला यश नक्कीच मिळेल तू मीरा होऊन विषाचा प्याला पे, असे लिहितात.

१८.३ या पत्रात गुरु आणि शिष्य त्यांचे वेगळे नाते सांगतात. येथे हे नाते श्रेष्ठ असल्याचे दिसते. तसेच चौधरी दु:खाचे ही ऋण मानतात कारण दु:खामुळे आपण एकमेकांना समजू शकतो आणि दु:खाने त्यांना जीवनाचा अर्थ सांगितला आहे. आणि हे तत्वज्ञान ते आपल्या विद्यार्थीनीला सांगतात. त्याचप्रमाणे ते प्रेमाविषयी लिहितात. प्रेम ज्याला करता आलं त्याला

जीवन जगता येते नाही असे हे विशाल प्रेम आपण कुणावर तर केले पाहिजे त्याला कोणत्याही मर्यादा नसल्याचे सांगतात. तसेच तारुण्यातील विकार, वासनेचे अधिक्य जास्त असते. त्यामुळे तारुण्य पचविणे अधिक कठीण असते. येथे त्यांच्या स्वभावतील मोकळेपणा वाचकाला दिसतो. तसेच विद्यार्थीनीला मुलीप्रमाणे धीर देऊन जीवनाशी संघर्ष करण्यास सांगतात. येथे त्यांचा स्वभावाचा वेगळा गुणविशेष वाचकांना दिसतो.

**१९.१ हे पत्र चौधरींनी श्री. डॉ. अडबेसाहेब यांना दि. ६/३/१९७४ रोजी लिहिले आहे.**

१९.२ हे पत्र डॉ. अडबे यांची वाट पाहून लिहितात. आपले संबंध निमंत्रणपत्रिकेपूरते मर्यादित नाहीत असे लिहितात. त्यांसाठी ते त्यांना निमंत्रणपत्रिकेतून पत्र पाठवितात. तसे पत्र त्यांना निमंत्रण पत्रिकेतून कुणालाही पाठवले नाही. काहींच्यावरती थोडाफार मजकूर मात्र लिहिलेला आहे. पण या पत्रिका त्यांच्या अवसानघात करतात आणि नेहमीप्रमाणे वाहवत जातात. अशाच काही वर्षापूर्वी पत्रिका जुळल्या होत्या. नवी स्वप्ने घेऊन कोणीतरी गृहप्रवेश केला होता. पण त्या पिवळ्या पत्रिका लाल झाल्या होत्या अशा पत्रिकांचे स्वप्न तुषारच्या बाबतीत बघितले होते पण सर्व स्वप्ने भंग झाली होती. येथे जेलच्या सेलचा चार भिंतीने त्यांना जेवढे जाणून घेतले होते तेवढे कुणीच त्यांना ओळखले नाही. तसेच पुढे लिहितात, तुमी पत्रिकेची अपेक्षा न करता यायला हवं होते मग हे काठेरी झाड तुमच्या कृतार्त झुकले असते. तसेच अजून झुकलेले आहे. चौधरींना 'तृषार्तची' प्रत स्वहस्ते द्यायची आहे ते देण्यासाठी त्यांची इच्छा आहे. मग ती देण्यासाठी मी घरी ही येईन त्यावेळी कितीही चुकवले तरी चुकणार नाही. त्यांना सामना करावा लागेल तसेच मनोरुग्णालयात येऊन भेट घेतली नाही त्याचे दु:ख त्यांना होते. त्यामुळे त्यांच्या विचारांचे चक्र चालू होते. पण भेटीमागे फक्त नमस्कार करावी ऐवढीच अपेक्षा असल्याचे लिहितात.

१९.३ या पत्रातून गणेश चौधरींचा डॉ. अडबेंच्या विषयी असलेला आदर व्यक्त होतो. त्यांना बरे करण्यासाठी झटलेल्या अशा व्यक्तीमध्ये यांचा वाटा मोलाचा आहे. चौधरी आणि त्यांचे स्नेह जुळले आहेत. त्यावेळी त्यांना आदरार्थ पत्र लिहितात. आणि पत्रिका पाहून त्यांच्या मनाला होणाऱ्या त्रासाचे ते सांगतात. त्याप्रमाणे त्यांनी आपल्यावरच्या हक्कापोटी त्यांच्यावर रागवण्याचा हक्क आहे. पण त्याचबरोबर त्यांनीही निमंत्रण पत्रिकची अपेक्षा न

करता यावे असे त्यांना वाटते. त्यांच्या न झालेल्या भेटीमुळे त्यांची झालेली अवस्था ते लिहितात. या पत्रातून चौधरींचे डॉ. अडबे व त्यांच्या कुटुंबाविषयीचा स्नेह व्यक्त झालेला आहे. येथे त्यांनी मनोरुग्णालयातून आल्यावर निर्माण झालेली नाती ते विसरले नाहीत. त्यांचा आदर मनात असल्याचे दिसते.

१९.४ या पत्रात डॉ. अडबेंना निमंत्रणपत्रिका पाठवतात त्यावेळी त्यांच्या सुप्त मनातील निमंत्रण पत्रिकेविषयी लिहितात, "आणि त्या मंगल पत्रिकेवर रक्ताचे डाग पडले, साहेब! एका गुलाबी स्वप्न पाहणारी, हळद लावलेली ती पिवळी पत्रिका रक्ताळली! आता निमंत्रण कुणास, कशास, अन् कसले? अन् जर या हातांना निमंत्रण पत्रिका पाठवायच्या होत्या तर आनंदान पाठविल्या असत्या तेव्हा....."२० त्यांच्या मनातील विचार काहूर डॉ. अडबे यांनी लिहित आहेत.

**२०.१ गणेश चौधरी हे पत्र श्री. भाऊसाहेब यांना दि. १४/३/१९७४ ते दि. १६/०३/१९७४ ते दि. १६/३/१९७४ या तीन भागात लिहितात.**

२०.२ या पत्रातून भाऊसाहेबांच्या बद्दल आदर व्यक्त होतो. चौधरींनी हे पत्र रात्री दोनच्या सुमारास लिहिले आहे. तसेच आतापर्यंत ज्यांना वाचले होते ज्यांच्याविषयी लहानपणापासून आदर होता. त्यांना भेटीची वेळ आली होती. तसेच ते त्यांच्यापेक्षा वयाने लहाण असल्यामुळे काय लिहावे त्यांना प्रश्न निर्माण झाला होता. त्यासाठी ते चांगदेवाचे उदाहरण देतात. त्यांना भव्य वटवृक्षाची उपमा देतात असे व्यक्तीमत्व त्यांच्या 'तृषार्त'च्या प्रकाशन समारंभाला पाहूणे म्हणून लाभले होते. या वेड्यासाठी तुमी पागलखाण्यात आला त्याबद्दल त्यांच्या मनात निर्माण झालेला आदर ते व्यक्त करतात. पुढे त्यांना लिहितात आता त्यांना धुंद व्हायचे आहे. बेधुंद होऊन जगायचे होते. त्यांनतर दि. १६/३/१९७४ रोजी लिहितात 'तृषार्त'च्या प्रकाशनाला उपस्थित राहू न शकलेले थोर कवी काकासाहेब त्यांच्या 'विकसन' समारंभासाठी आले होते. त्यानंतर त्यांनी त्याच्या 'हात' या कवितेवर उत्तर म्हणून पत्र लिहितात त्यावेळी त्यांना उत्तर चौधरी कवितेतून देतात. त्यानंतर काव्यचर्चा भरते ती संपल्यावर ते आपली बेहद सुटावसं वाटत हा मनातील काठकणा विचार सांगतात. ते भाऊसाहेबांना सांगण्यास सांगतात पण आता थोर व्यक्तीच्यावर विश्वास उरला नाही पण भाऊसाहेबांनी त्यांच्यासाठी केलेले त्या प्रयत्नांचे ते ऋण मानतात आणि काही चुक झाली

असेल तर क्षमा मागतात. त्यानंतर दि. १६/०३/१९७४ रोजी त्यांच पत्रात ते लिहितात ते मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष झाले म्हणून त्यांचे अभिनंदन करतात व त्यांना शुभेच्छा देतात.

२०.३ आपला कोणीतरी आदर करत आहे याचे चौधरींना आश्चर्य वाटते. येथे आता ऐकटेपणा निर्माण झाला असताना त्यांना भाऊसाहेबांसारख्या साहित्यिकांनी दिलेला आदर त्यांचा महत्वाचा वाटतो. त्यांना ते ज्ञानेश्वर समजतात. आपण त्यांच्यापेक्षा लहाण आहोत त्यांना काय लिहावे हा त्यांना चांगदेवाप्रमाणे प्रश्न पडला आहे. येथे चौधरी आपण त्यांची बरोबरी करू शकत नाही याची जाणीव त्यांना आहे. पण त्यांच्यामध्ये आपुलकी ही आहे त्यामुळे त्यांनी त्यांना सोडवण्यासाठी केलेले प्रयत्नाने त्यांना वाटणारे समाधान ते व्यक्त करतात. तसेच काकासाहेबांशी त्यांची चाललेली 'काव्यचर्चा' त्यामुळे त्यांना होणारा आनंद ही व्यक्त होतो. येथे त्यांना छोट्या गोष्टीतून आनंद मिळवण्याची प्रवृत्ती दिसते.

**२१.१ चौधरींनी हे पत्र ति. आप्पाकाकांना दि. १३/४/१९७४ रोजी पाठवले आहे.**

२१.२ अत्यंत भारावलेल्या अवस्थेत पत्रलेखन करतात. तसेच भावना अत्यंत ऊतिंगत झालेल्या आहेत. आणि ते सरसोतीच्या लाडक्या लेकीच्या चरणी लोटांगण घेतात. त्याचप्रमाणे मानसशास्त्रीय दृष्ट्याही मनाचे भाष्य केले आहे. तसेच या सरसोतीच्या लाडक्या लेकीची पोथी वाचून सर्व नतमस्तक होतात व पोथीला घेऊन मिरवतात. तसेच कवित्व हे घडविले जात नसून ते आपोआपच घडते. तसेच ही पाथी पवित्र आहे. मांगल्य आहे व ती स्वच्छ आणि आशास्थानी मनाने दर्शन घडविते. तसेच कृष्णाप्रमाणे ती शब्दाशब्दांत ब्रह्मांडांच दर्शन घडवित असते. तसेच तिची गोडी अवीटं अशी आहे. तिच्यात लोकांच्यात अंजन घालण्याचे सामर्थ्य आहे. आणि तिची प्रतिमा सर्वस्पर्शी अशी आहे असे ते सरसोतीच्या लाडक्या लेकीचे वर्णन करतात. आप्पाकाकांना आपण दु:खमागे टाकून आनंदी गाणे गात आहोत असे लिहितात. या 'सोपाना'मुळे सरसोतीच्या गाभारात जातात. तिथे आपल्या प्रतिमा उंचावण्याची इच्छा व्यक्त करतात. तसेच महाराष्ट्राचे लाडके रसिकराजा या सरसोतीपुढे नतमस्तक झाले तेथे आमच्या सारख्यांच काय व्यथा आहे. तसेच त्यांना त्यांच्या भाषेचा अभिमान आहे. तसेच माय बद्दल ही त्यांच्या मनांत असलेले आदरभाव सांगतात. तसेच हा भाषेचा गोडवा आजीच्या भावमधूर गीतांमुळे भासत असल्यांचे

सांगतात. त्याचप्रमाणे त्यांची वेगळी मनस्थिती असताना त्यांना आपलं मानून त्यांना कवीहृदयाची साक्ष देतात. त्यांना कॉलेजपासूनची त्यांच्या भेटण्याची इच्छा पूर्ण होते.

२१.३ गणेश चौधरी यांची कविहृदय आपणास येथे पहावयास मिळते. येथे सरसोतीवर असलेली भक्ती आणि सरसोतीची पोथी विषयीचे त्यांचे प्रेम/प्रार्थना ते लिहितात. तसेच यातील प्रत्येक शब्द त्यांना ब्रह्मांडाचे दर्शन घडवून देत असल्याचे सांगतात. तसेच त्यांना मराठी भाषेचा अभिमान ज्ञानेश्वरांच्या ऐवढा असल्याची दिसते. त्याचप्रमाणे त्यांचे बोली भाषेवरील प्रेम ही व्यक्त होते आणि 'माय' शब्दातील गोडवा/मार्दव ते वाचकांना सांगतात. तसेच आप्पाकाकांनी त्यांना समजून घेतल्यामुळे त्यांचे कविहृदयाची साक्ष त्यांना पटते. येथे चौधरी यांना आपल्या भाषे एवढाच आपल्या आईचा आदर ते सांगतात. माणूस कितीही मोठा झाला तरी संस्कृती सुधारली तरी 'माय' या शब्दाचे ते महत्व सांगतात.

२१.४ पत्र लेखनात सुरुवातच करत असताना त्यांचे अंतकरण भारावले आहे. त्या भारावलेल्या अवस्थेत ते लेखन करत असताना त्यांच्या 'सरसोतीच्या लाडक्या लेकी' विषयी लिहितात तसेच भाषेविषयी आणि 'माय' या शब्दाविषयी पत्रात लिहित जातात आणि शेवटी आप्पाकाकांनी आपल्या वेडाची दखल घेतली म्हणून लिहितात. येथे ते लिहित असताना आपण पत्र कोणास लिहित आहे? काय लिहित आहे? याचे भान त्यांना राहिलेले दिसून येत नाही असे वाटते. येथे त्यांच्या 'सुप्त मनात' लपलेल्या भाव-भावनांचा कल्लोह म्हणून या पत्राचा आपल्याला प्रत्यय येतो.

**२२.१ हे पत्र चौधरींनी प्रिय स्नेहांकिता सौ. श्रद्धा पराते यांना दि. १६/३/१९७६ रोजी पाठविले आहे.**

२२.२ या पत्रातून गणेश चौधरी लिहितात, त्यांनी पाठवलेली भेटवस्तू आवडली व त्यांचे पत्र ही मिळाले त्यांनतर पत्रलेखन म्हणून तशी अनेक पत्रे लिहितात, त्यातील काही हावेवर ही लिहितात. तसेच १५ दिवसांच्या सुट्टीसाठी आलो होतो. नागपुर मध्ये होतो. पण मनस्थिती ठिक नव्हती सारखे पित होतो. त्यामुळे घरच्यांना झालेला त्रासा बद्दलही लिहितात. आपल्याला पाच-सहा दिवस सभ्यतेने राहता आले नाही याची खंतही ते व्यक्त करतात. त्यावेळेपासून ठरवितात कुणाला त्रास द्यायचा नाही. म्हणून पत्रलेखन बंद करतात. पण भावनांना आवर न घालू शकल्यामुळे त्यांना एक भेटकार्ड पाठवतात. त्यांना

सुट्टीतील आपल वागण समजले असणार त्यामुळे संबंध ठेवायचे की नाही हा निर्णय त्यांच्यावर सोडतात. पण त्यांच्यामध्ये स्नेहाचे असलेल्या बंधनामुळे ते गुरफटले आहेत पण तुमी किती गुरफटला आहेत ते पत्र आल्यावर समजेल असे त्यांना वाटते तसेच 'तृषार्त' ला मिळालेल्या राज्यपुरस्कार व पारितोषिका विषयी लिहितात व हे यश त्यांच्यामुळे मिळाले म्हणून त्यांचे ऋण ही व्यक्त करतात. तसे पाहिले तर ऋण व्यक्त करण्यासाठी पत्रलेखन करतात.

२२.३ चौधरींच्या मानसिकतेची कल्पना या पत्रातून दिसून येते. आपल्यामुळे कुणालाही त्रास होऊ नये म्हणून त्यांनी पत्रलेखन बंद केले होते. पण सौ. श्रद्धा पराते यांनी पाठवलेल्या पत्रामुळे त्यांना आनंद वाटतो. तसेच आपण सुट्टीत घरच्यांना दिलेल्या त्रास आणि त्यांचे केलेले आर्थिक नुकसान यामुळे त्यांना झालेल्या यातना ते लिहितात. तसेच येथे आपण वाहवत गेल्यामुळे आपण आपल्या भावना व वासनांवर नियंत्रण ठेऊ शकत नाही. यांची ते स्पष्ट कबुली देतात. त्यामुळे सुट्टी मिळाल्यावर आपण वाहवत गेलो आणि जवळ असताना भेटू शकलो नाही हे ते लिहितात. तसेच आपल्या या वागण्यानंतर जर तुमाला माझ्यावर स्नेह ठेवायचे असतील तरच पत्रलेखन करावे अन्यथा करु नये असे स्पष्ट ते लिहितात. तसेच 'तृषार्त' च्या यशात तुमचा वाटा मोठा असल्याचे त्यांचे ऋण ते व्यक्त करतात. येथे चौधरी जरी वाहवत जात असले तरी त्यांना दुसऱ्यानी घेतलेल्या कष्टाची जाणीव आहे.

**२३.१ चौधरींनी हे पत्र प्रिय निशाजी यांना दि. ७/८/१९७९ रोजी लिहिले आहे.**

२३.२ चौधरींनी हे पत्र त्यांच्या 'दै. जनशक्ती'मधून आलेल्या कविता वाचल्यानंतर त्यांचे मत व्यक्त करताना ते लिहितात, या पत्राची सुरुवात करताना म्हणतात 'पाखरु' कविता आवडली आणि पत्र लिहिण्याचे ठरवितात. पण साहित्य परिषदेला गेल्यामुळे राहिले. त्यानंतर दुसरी कविता 'इमानाचं दान' वाचतात आणि हे पत्र लिहितात. ह्या कवितेतून त्यांनी आपल्या मनातील शल्य मांडतात आणि ते ही कुणाला न घाबरता. त्यातील सत्यता त्यांना जाणवते पण एवढे संवेदनशिल होऊन लिहू नका कारण ही दुनिया वाईट असल्याचे लिहितात. तसेच पहिल्या कवितेत पडलेला प्रश्न त्याचे उत्तर त्यांना दुसऱ्या कवितेत मिळते. ते लिहितात तुमचे आणि आमचे स्नेहांकितेचे पत्र बरेच दिवस आले नाही हे ही

लिहितात तसेच नागपुरला यायचे होते पण पैसे नसल्यामुळे व तुमच्याकडे मागण्याच्या संकोचामुळे ते गेले नाहीत. तसेच स्नेहांकितासाठी कार्यक्रम आखला होता पण त्या आल्या नाहीत तसेच स्नेहांकिताला हे पत्र दाखवावे ही त्यांची इच्छा ही ते लिहितात आणि त्यांच्याकडे असलेल्या 'भागवत' विषयी सांगतात. त्यामुळे तुषारची आठवण होते हे ही लिहितात. व श्यामची लग्नपत्रिका आली होती तिला M.O. पाठवितात पण तो परत येतो याविषयी लिहितात तसेच येथे भावनेला प्राधान्य देऊन पत्रलेखन करताना दिसतात.

२३.३ एक साहित्यिक दुसऱ्या साहित्यिकाच्या भावना समजतो. म्हणूनच 'पाखरु' कविता वाचल्यानंतर त्यांच्यामनात प्रश्न निर्माण होतो. पण 'इमानाचं दानं' वाचल्यानंतर तो प्रश्न दुर होतो. येथे गणेश चौधरी यांच्या मनात असलेल्या निष्ठेविषयी, त्यांच्या सत्य लेखनाविषयी व त्यांच्या भावनेविषयी लिहितात. तसेच त्यांना अनुभवावरुन प्रेमळ सल्लाही देतात. येथे ज्यांना दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव तर आहेच पण त्यांना आणखी दु:ख होऊ नये म्हणून त्यांना दोन प्रेमळ गोष्टीही सांगतात. तसेच स्नेहांकिताचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न हे ते करतात. शेवटी सांगतात कदाचित माझा अंदाज किंवा मी व्यक्त केलेले मत ही चूकीचे असू शकते. येथे आपली चूक कबूल करण्याचे धैर्य ही त्यांच्यात आहे.

२३.४ येथे या पत्रात त्यांच्या कवितेला उत्तर देताना त्यांचे दु:ख ते मांडतात. तसेच डॉक्टरांनी सांगून सुद्धा कोणत्याही प्रकारचे पथ्य ते पाळत नाहीत, आजारी पडतात. तसेच शेवटी ते आपल्या मानसिकते विषयी लिहितात, ''पत्र संपलं-संपवलं जे मनात आलं ते लिहिलं. बुद्धिवादापेक्षा, विचारपेक्षा भावना प्रबळ झाल्या अन् लिहिल अस भावनेच्या ओघात वहाणं टाळतो आजकाल दुसरे किनाऱ्यावर कोरडे असतात अन् माझा मीच गटांगळ्या खात रहातो प्रवाहात म्हणून टाळतो. पण आज मन आवरता आलं नाही त्रासाबद्दल क्षमस्व.''[२१] येथे चौधरी लेखन करत असताना त्यांच्या विचारवलयं चे वावटळ सुरु होते आणि त्यामध्ये त्यांची होणारी मनाची अवस्था दिसून येते.

**२४.१ गणेश 'दा'ने हे पत्र चि. दिवाकर यांना लिहिले आहे.**

२४.२ गणेश चौधरींना घरापासून व घरातील व्यक्तींपासून एकट्याला लांब ठेवल्यामुळे त्यांच्या मनाची झालेले आवस्था लिहितात. त्यांना लहानमुलांच्या बरोबर खेळायचे आहे.

तसेच आई-वडिलांचा सहवास त्यांना हवा आहे पण त्यांच्या या विकृत वागण्यामुळे ते सर्व आनंदाचे क्षण त्यांना मिळाले नाहीत तसेच त्यांना उपचार म्हणून आगोदरच शॉक दिले असते तर हे संकट आले नसते. तसेच दादांनी दि. १२/६ ला मुदतपूर्व सुटकेचा केलेला अर्ज सरकारने फेटाळला त्यावरती सरकारने दिलगीरी व्यक्त केली त्यावर ते म्हणतात त्यांच्या दु:खात मीही सामिल आहे. तसेच चि. स्नेहजा देवतळे यांच्या विवाहासाठी त्यांनी पाठवलेले पत्र व त्यावरती मधुकराव यांचे आलेले आभारपत्राविषयी लिहितात. तसेच भारतीच पत्र मिळाले त्यातून सर्वांची खुशाली समजली होती. पण आई-वडील जर त्यांच्यामुळे दु:खी झालेतर मी कोलमडून पडेन असे लिहितात. त्याचप्रमाणे मी आता आनंदी आहे तसेच मरणाची ओढ त्यांना लागली आहे तसेच दिवाकरच्या दारु पिण्याची गोष्ट त्यांना खटकते. त्यावरती त्यांना उपदेशपर लिहितात. तसेच वडिल तीर्थयात्रेने आले पण त्यांना भेटण्यासाठी आले नाहीत तरी भेटण्यासाठी यावे ही इच्छा व्यक्त करतात.

२४.३ चौधरींच्या मनात लहान मुलांच्या विषयी असलेले प्रेम दिसते. त्यांच्याशी खेळण्यासाठी पुन्हा लहान व्हावे असे वाटते. त्यांचप्रमाणे त्यांच्यावर नियतीने एकटेपणा दिलेला शाप त्यामुळे त्यांचे मन हेलावते तसेच संस्काराविषयी त्यांच्या मनात असलेले कणात्व दिसून येते. आई-वडिलांच्या विषयीचे प्रेम त्यांच्या दु:खाने त्यांचे मन अस्वस्थ होते. त्यासाठी ते लिहितात पण आहे त्या परिस्थितीत आनंदी आहे. त्यांचे नेत्र पल्लवीत करुन पाप त्यांना घ्यायचे नाही. तसेच दिवाकरवर असलेले प्रेम ही दिसून ही येथे दिसते. दिवाकरला प्रेमाने 'एकच प्याल्याचे' दुषपरिणाम सांगतात. तसेच आपण तीर्थयात्रा करु शकलो नाही ही खंत मनात आहे. येथे घरातील व्यक्तिंविषयी त्यांच्या मनात असलेल्या प्रेमाच्या झऱ्याचे दर्शन वाचकांना होते.

**२५.१ हे पत्र गणेश 'दा'नी चि. दिवाकर चौधरी यांना लिहिले आहे.**

२५.२ या पत्रातून ते आपल्या द्विधा मनाचे मनोविश्लेशन करत आहेत. त्यांना हा शाप लहानपणापासून मिळाला होता. त्यामध्ये 'लोकांचे काहीही' बोलणे त्यामुळे 'सुप्त मनाला' धक्का बसतो. तसेच त्यांचे जाणीवेचे मन त्यांना नेणीवेत सोडल्यामुळे चालू होऊ लोकांचे बोलणे व मग विचारांचे व दृश्याचे चक्र चालू होत असे. त्यांवेळी त्यांची सर्व समजूत घालत पण त्याचा काहीही उपयोग होत नसे. हा नियतीने मांडलेला खेळ होता असे लिहितात. ते

जळगांवहून घरी येत होते त्यांवेळीचा प्रसंग लिहितात. डॉक्टरांना निळूने काहीतरी सांगीतले हा त्याचा संशय होता. असा संशय त्यांचा मित्र, नातेवाईक, वाड्यातील व गावातील सर्व लोकांच्यावर घेत त्यानंतर कोणाशीही बोलायचे नाही ठरवतात. तसेच दिवाकरच्या लग्नानंतर ओट्यावर झोपल्यामूळे भास, भ्रम, संशयात वाढ झाली आणि जूनमध्ये त्याचे रुपांतर वेडात झाले. तसेच शाळेत एका वर्षासाठी रजेचा अर्ज करतात त्यावेळी काय लिहावे, शारिरीक आवस्था कि मानसिक अवस्थेमुळे रजा पण नंतर लोकांची भिती मनात वाटे. या अर्जानंतर स्वत:ला सावरणे ही अवघड झाले. संडासला जाताना वाड्यात, आसपासचे लोक काहीही म्हणून हा संशय वाटे. एकदा तर ते एकनाथ दादांना वाटेल ते बडबडले आणि त्यानंतर रात्र रात्र सुरु होऊ त्यांच्या वेड्या संशयाचा पाटखेळ. येथे गणेश चौधरी स्वत:च्या मनाची वाताहात लिहितात.

२५.३ आपण असे पत्र लिहिता त्यामुळे सर्वांना त्रास होतो याची जाणीव आहे. पण शेवटेचे म्हणून स्वत:च्या वेडाचे मनोविश्लेषण चौधरी करतात. त्यांना हा शाप लहानपणीच मिळालेला होता. त्यांना आपल्या 'सुप्त मनाला' समजावले नाही त्यामुळे त्यांची शोकांतिका झाली आहे. तसेच येथे त्यांना सर्व समजावतात पण आपली बाजू कोणी घेत नाही. त्यामुळे एकटेपणा निर्माण झाला. तसेच नियतीच्या खेळीची जाणीव त्यांना झाली आहे. तसेच आपण चांगले वागण्याचा निश्चय करुन तो पूर्ण करु शकत नाहीत तसेच ओट्यावर झोपल्यामुळे वाढत गेलेला संशय व त्यातून निर्माण झालेले वेड ते लिहितात. शाळेत एक वर्षाच्या रजेसाठी अर्ज देतात. पण कोणी देऊ नका असे ही बोले नाही. त्यामुळे त्यांना झालेले दु:ख ते लिहितात. आपले वेड जून मध्ये कसे वाढत गेले आणि लोकांचे बोलणे सांगतात. येथे गणेश चौधरी आपण कसे वाहवत गेलो. आपल्या 'सुप्त मनाने' कसा घात केला. त्यामुळे त्यांची झालेली शोकांकिका दिवाकरला सांगतात.

२५.४ गणेश चौधरी मनोविश्लेषण करत असताना त्यांना भूतकाळातील नेणीवेतील घटना लिहित असताना त्यांची मानसिकता ते सांगतात. त्यामध्ये 'लोक काहीही बोलतात' त्याचे आवाज व त्यामुळे निर्माण होणारा संशय ते सांगतात, ''तुझ्या लग्नातचं रुखवत सोडताना सर्व बाया गोळा झाल्या, मी ओट्यावरच मी बाबांना म्हंटल, 'ही आजी मला काहीही म्हणते. काय डोक फोडायचं त्यांच्याजवळ असंचं बाबंना वाटलं असेल दिवाकर,

बाबांजवळ, काकांजवळ मेच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात जे बोललो तो भयाण मुर्खपणा होता. काकांजवळ 'भाऊबंद' म्हणतात तर बाबांजवळ लोक म्हणतात."[२२] येथे त्यांना लोकांची लहानपणापासून वाटणाऱ्या भीतीचे रुपांतर संशयात झाले आणि विचार करुन वेड निर्माण झाले. म्हणजेच चौधरी यांच्या मनोविकृतीतून वाढत गेलेले वेड दिसून येते.

**२६.१ गणेश चौधरींनी हे मृत्युपत्र कोणास लिहिले नाही. त्यांच्या मनातील भावकल्लोळ या पत्रात पत्रात मांडत आहेत.**

२६.२ चौधरींनी या मृत्यपत्रामध्ये मृत्युचे स्वागत करतात. येथे काहीतरी गुज त्यांना सांगवयाचे आहे पण त्याआधी मरण्यापूर्वी कोणास आपला उपयोग झाला तर करुन द्यावा म्हणून लिहितात. आपण या जगाच्या रंगमंचावर निर्मात्याच्या हातातील एक कटपुतळी आहे. त्याने आपले रंगमंचकावरचे संवाद, अभिनय, प्रवेश सर्व ठरवून ठेवलेले असते. आपण फक्त ते पूर्ण करत आहेत हे सांगत आहेत. येथे त्यांच्या रंगमंचकावरील सर्व प्रिय पाखरे उडून गेले आहेत आणि ते उध्वस्त उद्यानात एकटेच फिरत आहेत. येथे सर्वांची रंगभूषा बदलतात याची जाणीव ही होत नाही याची जाणीव कोणत्याही नटाला नसते त्यामुळे त्यांना आज हे मृत्युपत्र लिहिण्याची वेळ आली आहे. पण हे मृत्युपत्र लिहिलेले पाहून काही लोक त्यांच्यावर हासतील ही पण हे एका भिकाऱ्याने/कंगालाने लिहिलेले मृत्युपत्र आहे. येथे त्याला अग्नी देण्यासाठी वारस ही नाही अशा माणसाने हे मृत्युपत्र लिहिले आहे. येथे त्यांना दफन करण्यासाठी जागा निवड्याचा प्रश्नच उद्भवत नाही. एक कफलक, भंग पावलेला व्यक्ती ज्याला मृत्युची फिकीर नाही.

चौधरी लिहितात अत्यंत धुंदीत, सुर गुंफीत जगत असताना धरणीकंप झाला आहे. आणि हे तडकलेले मन त्यावरचे उठलेले कंगोरे स्पष्ट होत आहेत. या परमेश्वराने 'शापीत मनाला' दिलेला शाप होता. आणि ते स्वतःची शस्त्रक्रिया करत होते. या शापाने त्यांच्या आयुष्याची केलेली ही वाताहात होती. शाप त्यांनी लहानपणापासून त्यांचे ओझे सहन केले आहे. आणि हे शापित मन त्यांच्यावर वेडाचे संस्कार करत होते. त्यामुळे या वेडाचे प्रत्येक मनासामानसाच्यात दरी निर्माण केली आणि गर्दीत असताना त्यांचे मन समजल्यामुळे लोक त्यांना शाप देत होते आणि हे दुरवरुन आवाज येत व त्यांचे 'लोक काहीही बोलतात' हे बडबडे सुरु होई त्यांचावर उपचारासाठी डॉक्टरांनकडे गेले पण काही उपयोग झाला नाही.

'लोक बोलतात' हा त्यांचा गंडच निर्माण झाला होता. तरीही त्यामध्ये त्यांच्या या 'काचेच्या मनाशी' अथक लढा चाललेला होता. पण त्यामध्ये अपयश आले होते. त्यांची पत्नीची इच्छा पूर्ण करायची होती. जेव्हा ते वेडात बडबडत तेव्हा त्या समजवत, म्हणत 'माझ्या मनाचा कोळसा होतो नुसता! हे वाक्य त्यांना जेव्हा समजत नाही यामध्ये दडलेले महाकाव्य त्यांनी जाणून घेतले नाही. आणखी एका रात्री समजूत घालत होत्या त्यावेळी त्यांची बडबडणे, आवाज आणि जाणीवेत आल्यावर आपल्या वागण्याचा पश्चाताप करत तसेच त्यांच्या पत्नी त्यांना बरे वाटावे म्हणून नवस करत होती. एक म्हणजे सत्यनारायण घालायचा आणि दुसरा शिरागडच्या देवीला नारळ फोडायचा, हे शब्द त्यांच्या मनात घुमत होते. एक नवस त्यांनी कोर्टात सत्य बोलून पूर्ण केला आणि दुसरा मेल्यावर आपल्या डोक्याचा नारळ फुटेल तेव्हा पूर्ण होणार असे ते लिहितात.

चौधरींनी त्यांच्या गावापासून दोन मैलावर संत वाहणाऱ्या तापी नदी बद्दल लिहितात. तसेच त्यांच्या आसपासच्या वातावरणाचे सुरेख वर्णन करतात. या तापी नदीच्या काठावर त्यांचे गाव वसले होते आणि त्या नदीवरचे ग्रामकन्याचे धूणी धूणे तसेच तिथे पडलेले प्रतिबिंबाचे सुरेख वर्णन करतात. आणि शेवटी त्यांनी त्यांच्या मरणानंतर चितेचे वर्णन करतात. त्यावेळी त्याचितेवर कोणी रडणार नाही ऐवढे नशिब नाही अशी खंत व्यक्त करतात. आणि आपली राख तापीमाई आपल्या कुशीत घेऊन पूर्वीप्रमाणे संत वाहत राहिल. येथे चौधरी आपल्या मृत्युचे अत्यंत तटस्थेने चिंतन करताना दिसतात.

२६.३ आपल्या मृत्युचे स्वागत करताना त्यांच्या मनात कोणतेही भय नाही. अत्यंत तटस्थपणे भूतकाळातील घटनांचा एक एक पट उलगडून दाखवतात. आपण निर्मात्याच्या हातातील बाहूले आहे त्यामुळे आपले जीवन हे संपूर्ण त्यांच्या हातात असल्याची जाणीव त्यांना होते. येथे त्यांची देवावर श्रद्धा असल्याचे दिसून येते. तसेच प्रियव्यक्तिची त्यांना आठवण होते. त्यावेळी त्यांच्या मनाचा भावकल्लोळ माजलेला आहे. तसेच त्यांच्या 'शापीत मनाची' त्यांना जाणीव झालेली आहे आणि त्यांनी हे मृत्युपत्र लिहिले हे हस्यास्पद असल्याची जाणीव आहे. चौधरींना अग्नी देण्यासाठी वारस नाही त्यामुळे त्यांच्या मनात असलेले दु:ख ते सांगतात. तसेच आपण धुंदीत जगत असताना या 'शापीत मनाने' कसा घात केला हे वाचकांना सांगतात. येथे चौधरी मृत्युपत्र लिहितात ते आपल्या पत्नीची इच्छा

पूर्ण करण्यासाठी या शापीत मनाने जरी माणसाच्या मनात दरी निर्माण केल आहे. त्यांच्यावर लहाणपणापासून 'लोक बोलतात' या शब्दाचा आघात झालेला आहे. त्यामुळे त्यांचे विकृत वागणे आणि बडबडणे चालत होते. तसेच त्यांनी संघर्ष केला. त्यांच्यासाठी नवस केले पण त्यांच्यावर शापत मनाने कवड्या केला होता. याची खंत व्यक्त करतात. शेवटी पत्नीचे नवस ते फेडत आहेत. तेही स्वत:ची आहूती देऊन त्यांचे आपल्या पत्नीवरील प्रेम त्या प्रेमापोटी ते हे लिहित असल्याचे दिसतात. येथे गणेश चौधरी मृत्युपत्र लिहितात पण कुठेही आपले मन वाहून देत नाहीत. आपल्या 'शापीत मनावर' मात करण्याचा प्रयत्न ते करत असल्याचे दिसतात.

२६.४) चौधरी मृत्युपत्र लिहित असताना त्यांचा जीवनापेक्षा मृत्युवर प्रेम आहे. तसेच कंगाल असताना मृत्युपत्र लिहितात आणि त्यांना वारसही कोणी नाही. त्यांना 'शापीत मन' हा शाप लहानपणीच मिळाला होता. ते आपल्या विकृत वागण्याविषयी लिहितात, "– त्या रात्री मी वेडात असाच किती ओंगाळवाणं बडबडलो! सर्वच विसर पडला होता मला गेले कित्येक दिवस हेच सुरु होतं काय चाललंय, काय दिसतयं, काय ऐकतोय हे उमजेना. फार फार त्रास घेतल्याशिवाय डोळे जड, डोक सुन्न व कानावर 'लोक म्हणतात' ते आवाज आणि सर्वांचा परवा......किंचित भानावर आलो तेव्हा ती डोक्यावरुन हात फिरवीत होती. कसंबसं म्हणाली, 'असं बोलू नका! माझ्या मनाचा कोळसा होतो नुसता!"[२३] येथे त्यांना त्यांच्या विकृत मनाची जाणीव झाली आहे. पण सर्वस्व संपूण गेल्यानंतर त्यांना आपल्या विकृत वासनेबद्दल ही लिहितात. त्यावेळी त्यांच्या पत्नीला सहन करावे लागलेल्या दु:खाविषयी लिहितात. येथे या पत्रात त्यांचे विकृत मन ही दिसून येते.

गणेश चौधरी यांचे 'कोचचं मन' या पत्रात्मक आत्मकथनामध्ये एकून २६ पत्रे आहेत. यामध्ये ते दुभंगलेल्या मानसिकतेची व्यथा आप्तस्वकियांना सांगतात. त्यांच्या प्रत्येक पत्रात ती मानसिकता डोकावताना दिसते. 'काचेचं मन' या पुस्तकातून गणेश चौधरी कळवळून एक गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतात की त्यांना होणारा त्रास अत्यंत जूना आहे. कोवळ्या वयापासून या वेडाने जाळे विणणे सुरु केले आहे. त्याचबरोबर त्यांनी चांगुलपणातील वैचारिक जडणघडणीचा पाठपुरावा करुन स्वत:च स्वत:च्या वेडाची मानसशास्त्रीय संगती लावतात. येथे त्यांनी संपूर्ण पत्रात्मक आत्मकथनात त्यांनी स्वत:चे

कठोर आत्मनिरीक्षण केलेले आहे. गणेश चौधरी हेच वेगळेपण साहित्यात मांडतात आणि ही पत्रे साहित्यात मानदंड ठरलेली दिसून येतात.

# * संदर्भ सूची *


१) 'काचेचं मन' - गणेश चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, पहिली आवृत्ती; जून १९९०, पृष्ठ ५

२) मंथन (लोकमत) - डॉ. रवींद्र भास्करराव पाटील, रविवार दि. २६ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४

३) मंथन (लोकमत) - डॉ. रवींद्र भास्करराव पाटील, रविवार दि. १२ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४

४) 'काचेचं मन' - गणेश चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, पहिली आवृत्ती; जून १९९०, पृष्ठ १९

५) तत्रैव - पृष्ठ ३७

६) तत्रैव - पृष्ठ ३५

७) तत्रैव - पृष्ठ ४३

८) तत्रैव - पृष्ठ ५९

९) तत्रैव - पृष्ठ ४६

१०) तत्रैव - पृष्ठ ६७

११) तत्रैव - पृष्ठ ६५ ते ६६

१२) मंथन (लोकमत) - डॉ. रवींद्र भास्करराव पाटील, रविवार दि. १९ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४

१३) 'काचेचं मन' - गणेश चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, पहिली आवृत्ती; जून १९९०, पृष्ठ ८०

१४) तत्रैव - पृष्ठ ८४

१५) तत्रैव - पृष्ठ ८७

१६) तत्रैव - पृष्ठ ९२

१७) तत्रैव - पृष्ठ १०२ ते १०३

१८) तत्रैव - पृष्ठ ११०

१९) मंथन (लोकमत) - डॉ. रवींद्र भास्करराव पाटील, रविवार दि. ३ ऑक्टोबर २००४, पृष्ठ ७

२०) 'काचेचं मन' - गणेश चौधरी, मॅजेस्टीक प्रकाशन, पहिली आवृत्ती; जून १९९०, पृष्ठ १२६

२१) तत्रैव - पृष्ठ १४२

२२) तत्रैव - पृष्ठ १४७

२३) तत्रैव - पृष्ठ १५६